## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र. १४५१/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रवी श्यामलाल बाबरीया<br>प्लॉट नं. १२, गुरुनानकपुरा, शनिचरा मार्केट, नागपूर<br>ता.जि. नागपूर -१७ | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य/मुख्याध्यापक<br>इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०१/१२/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ०१/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०१/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे डॉ. खान निवासी वैद्यकीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर यांचेकडे दि. २९/०७/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये कु. एन. व्हि. न्यालेवार प्रशासकीय अधिकारी यांचे संबंधीत माहिती मागितलेली असून प्रथम नियुक्ती गृहपाल या पदावर नियुक्ती पासून दिनांक २९/०७/२०१०

पर्यंत सेवापुस्तिके मधील प्रथम नियुक्ती गृहपाल पदाची नोंद असलेल्या पानाची छायांकित प्रत, सेवापुस्तिके मधील म.लो.आ. द्वारे प्रशासकीय अधिकारी या पदाची नियुक्ती आदेशाची नोंद असलेल्या पानाची छांयाकित प्रत, प्रथमनियुक्ती पासून आज पर्यंत घेतलेली अर्जीत रजा व परावर्तीत रजेची (लिव्ह अकाउन्ट) मध्ये सेवापुस्तीके मधील नोंद असलेल्या पानांची छायांकित प्रत, प्रथमनियुक्ती पासून आज पर्यंत घेतलेली अर्जीत रजा व परावर्तीत रजेची (लिव्ह अकाउन्ट) सेवापुस्तीके मधील नोंद असलेल्या पानांची छायांकित प्रत. याप्रकारची माहिती मागितलेली असून सदर माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. २४/०८/२०१० च्या पत्रान्वये असे कळविले की, आपण कु. न्यालेवार हिच्या बाबतची माहिती मागितलेली असून सदर व्यक्ती आपणास ओळखत नसल्याने तिने त्रयस्थ व्यक्तीस माझी संमती असल्याशिवाय माझ्या अभिलेखांची व माझेबाबत कोणतीही गोपनीय माहिती देऊ नये असे या कार्यालयात दि. १३/०८/२०१० च्या पत्रान्वये निवेदन दिले आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे नियम ११ मधील पोटनियम १ अन्वये आपणास त्रयस्थ व्यक्ती समजून माहिती देता येणार नाही असे जनमाहिती अधिकारी इंदिरागांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र. ५२३९ दि.२४/०८/२०१० अन्वये अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि.०८/०९/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी इंदिरागांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. २३/०९/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या नियम ११ मधील पोट नियम (१) अन्वये त्रयस्थ व्यक्ती म्हणून माहिती देता येणार नाही असाच निर्णय दिलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५.    अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांनी माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९/०७/२०१० रोजी कु. एन. व्ही न्यालेवार प्रशासकीय अधिकारी यांचे संबंधित त्यांच्या सेवा पुस्तिकेतील माहिती मागितलेली आहे. तथापी ती माहिती देण्यास जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नकार दिलेला आहे. जनमाहिती अधिकारी यांनी त्यावर असे सांगितले की, त्रयस्थ व्यक्तीने मागितेली माहिती वैयक्तिक असल्यामुळे व ज्या व्यक्तीची माहिती मागितलेली आहे तीने नकार दिल्यामुळे व अपीलकर्त्यास ओळखत नाही असे कळविल्यावर अधिनियमाचे कलम ११ प्रमाणे देता येत नाही.

६.    अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही कोणत्याही व्यापक जनहिताकरिता मागितलेली दिसून येत नाही. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (जे) अन्वये जी माहिती, व्यक्तीच्या खाजगी बाबतीत विनाकारण हस्तक्षेप करित असेल अशा व्यक्तिस कोणत्याही प्रकारची वैयक्तिक स्वरुपाची माहिती देता येत नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी माहिती न देण्याचा घेतलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.    अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२.    अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४५२/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री पॅंथर यशवंत बळराम अंबागडे<br>मु. पो. सिर्सी<br>ता. उमरेड जि. नागपूर -४४१२१४ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>जिल्हा परिषद, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०१/१२/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ०१/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०१/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता उशिरा हजर झाले. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक (पंचायत विभाग) श्री चंद्रशेखर सलामपुरे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांनाच सुनावणीस प्राधिकृत केले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले.

२. अपीलकर्ता यांनी दि. १९/०६/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे निवेदनाद्वारे राज्य माहिती आयोगाच्या दि.२५/०३/२०१० चे अपील १३३/२०१० च्या अनुषंगाने पारित केलेल्या आदेशाची अमंलबजावणी त्वरीत करणेबाबत केलेल्या

तक्रारीच्या अनंषंगाने अर्जदाराचे निवेदनावर घेतलेल्या निर्णय दस्तऐवजांच्या साक्षांकित प्रती पुरविण्याची व्यवस्था करावी अशी माहिती मागितलेली असून सदर माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांचेकडे अपीलकर्ता यांचा दि.१९/०६/२०१० चा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करु शकले नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. ३०/०७/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्यानुसार दि. ०२/०९/२०१० रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली परंतू सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर होते त्यामुळे त्यांना सुनावणीची पुन्हा संधी देण्यात आली व दि. ३०/०९/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली त्याही दिवशी अपीलकर्ता हे गैरहजर होते. व जनमाहिती अधिकारी हे हजर होते. दि.३०/०९/२०१० च्या प्रथम अपीलाच्या निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा माहिती अधिकाराखालचा अर्ज प्राप्त न झाल्यामुळे तसेच दोनही वेळेच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे अपीलकर्ता यांचे प्रथम अपील खारीज केले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विहीत मुदतीत मिळाली नाही. व प्रथम अपील दाखल केल्यानंतर ते खारीज केल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही.

५.. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा अर्ज त्यांचे कार्यालयास प्राप्त झाला नाही त्यामुळे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करु शकलो नाही असे आयोगासमोर सांगितले. तसेच अपीलकर्ता यांनी त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. अपीलकर्ता यांना दि.०२/०९/२०१० व दि. ३०/०९/२०१० या दोनही वेळेस प्रथम अपीलाच्या सुनावणीची संधी दिली परंतू दोनही वेळेच्या प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर राहीले.

म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नाही ही बाब लक्षात घेवून अपीलकर्ता यांचे प्रथम अपील खारीज केले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद नागपूर यांनी अपीलकर्ता यांना दि. १२/११/२०१० च्या पत्रान्वये श्री व्ही. पी. लोखंडे, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उमरेड यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यास्तव खंडविकास अधिकारी, पंचायत समिती उमरेड यांनी दि. ०२/०६/२०१० चे पत्रान्वये आदेश पारित केले आहेत. त्या आदेशाची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविली.

६. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचा दि. १९/०६/२०१० चा माहिती अधिकारातील अर्ज जिल्हा परिषद (पंचायत) नागपूर यांचेकडे दिलेला आहे असे आवक नोंदवहीमध्ये त्याची नोंद दिसून येते. परंतू सदरचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक (पंचायत विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेपर्यंत पोहचलेला नाही. म्हणजेच सदरचा माहितीचा अर्ज पंचायत विभागाकडे प्राप्त झालेला नाही. अपीलकर्ता यांचा दि. १९/०६/२०१० चा माहिती अधिकाराखालील अर्ज पाहिला असता त्यामध्ये अपीलकर्ता यांनी त्यांचे दि. १८/०५/२०१० च्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सुनावणीचेवेळी जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, दि.१८/०५/२०१० चे निवेदनावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद नागपूर यांनी त्यांचे दि.१२/११/२०१० च्या पत्रान्वये केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास पाठविलेली आहे. अपीलकर्त्याने दि.१२/११/२०१० चे पत्र मिळाल्याचे मान्य केले. तथापी दि. १२/११/२०१० च्या पत्रात नमूद केलेल्या खंडविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी दि. ०२/०६/२०१० च्या आदेशानुसार विस्तार अधिकारी लोखंडे यांचेवर केलेल्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीची प्रत अपीलकर्ता यांना पाहिजे होती व ती त्यांना मिळालेली नव्हती त्या पत्राची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १४५३/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री भुमेश तुळशिरामजी खापेकर<br>नाईकवाडी बांग्लादेश, दिपक पार्डीकर यांचे घराजवळ<br>नागपूर, ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मा. जिल्हा न्यायाधिश क्र.१<br>जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक<br>जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/१२/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ११/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०१/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता उपस्थित असून त्यांच्या वतीने ॲड. ताजणे हजर होते. जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा हे हजर होते. दि. ०१/१२/२०१० रोजी अपीलकर्त्याचे वकीलांनी पुढील तारीख देण्याची विनंती केली म्हणून सुनावणी होवू शकली नाही. त्यानुसार अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीची पुढील तारीख दि.१४/१२/२०१० देण्यात आली. सुनावणीस अपीलकर्ता हजर असून त्यांचेवतीने ॲड. ताजणे हे उपस्थित आहेत. उत्तरवादी यांचे तर्फे प्रबंधक जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा श्री वाय. आर. साठवणे हे उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०२/०८/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा यांचेकडे लघुलेखक निम्नश्रेणी परिक्षेतील किती लोकांना Call Letter पाठविण्यात आले त्यामधून चाचणी परिक्षेला किती उमेदवार उपस्थित होते, चाचणी परिक्षेला उत्तीर्ण होवून किती उमेदवार मुलाखतीला उपस्थित होते, चाचणी परिक्षेमध्ये जे उमेदवार उपस्थित होते त्यामधील इंग्रजी टंकलेखन, लघुलेखन, मराठी लघुलेखन, टंकलेखन तसेच मुलाखतीस किती गुण मिळाले ? (प्रत्येक चाचणी निहाय व उमेदवार निहाय) अशी माहिती मागितलेली असून सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक यांनी दि. ०६/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना एकूण नऊ मुद्यांपैकी ८ मुद्ये नकारात्मक स्वरुपाचे असल्याने माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. २५/०८/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधिश क्र.१ जिल्हा न्यायालय भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. १७/०९/२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला असून त्या निर्णयात त्यांनी पदभरती बाबतची प्रक्रीया ही कलम १३ (इ) नुसार गोपनीय स्वरुपाची असल्याने माहिती देता येणार नाही म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज केले आहे त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५. अपीलकर्ता यांचे वकील श्री ताजणे यांनी आयोगासमोर युक्तिवाद करतांना सांगितले की, अपीलकर्ता यांनी मराठी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक पदभरती बाबत एकूण ३ मुद्यांवर जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक यांना माहिती मागितली असता त्यांनी शासन नियमांप्रमाणे गोपनीय स्वरुपाची माहिती असल्याने देता येत नाही असे कळविले होते व अद्यापही माहिती दिली नाही. ॲड. ताजणे यांनी असेही सांगितले की जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास नकार दिल्यामुळे अपीलकर्त्याने प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधिश क्र. १ यांचेकडे प्रथम अपील दाखल केले परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. १७/०९/२०१० रोजी निर्णय देवून प्रथम अपील फेटाळले आहे. परंतू प्रथम अपील फेटाळण्याची बाब ही चुकीची आहे यापूर्वी जिल्हा न्यायालय औरंगाबाद यांनी

काही अर्जदारांना भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याच आधारावर भंडारा न्यायालयानेही माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे आग्रहाचे प्रतिपादन ॲड. ताजणे यांनी आयोगासमोर केले.

६. जनमाहिती अधिकारी यांनी ०१/१२/२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला असून त्यामध्ये त्यांनी अर्जदाराने मागितलेल्या इंग्रजी टंकलेखन व मराठी लघुलेखन परिक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या गुणांची (प्रत्येक चाचणी निहाय व उमेदवार निहाय) माहिती मागितली होती. परंतु मा. उच्च न्यायालय, मुंबई गोपनिय पत्र क्र. (जन.)-५६०१/५७/२३, दिनांक दि. ०८/०१/२०१० नुसार निवड प्रक्रिया २०१० ही गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई अधिसुचना क्रमांक पी. ०७०३/२००९ दि. २५ ऑगस्ट २००९ अन्वये दि.०३/०९/२००९ चे शासन राजपत्र भाग-चार-क मध्ये प्रसिध्द केल्यानुसार महाराष्ट्र राज्य जिल्हा न्यायालय, माहिती अधिकार अधिनियम , २००९ चे नियम १३ (क) व (इ) नुसार सदर प्रक्रिया गोपनिय स्वरुपाची असल्यामुळे अपीलकर्त्याने मागितलेली माहिती पुरविणे योग्य नसल्यामुळे अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्यात आला, असे कळविले आहे.

७. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, नियम १३ (क), (इ) नुसार लघुलेखक निम्नश्रेणी या पदाची भरती प्रक्रिया गोपनिय स्वरुपाची असल्यामुळे अपीलकर्तास गोननिय स्वरुपाची माहिती देता येणार नाही त्याचप्रमाणे त्यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील गोपनिय पत्र दि. ०८/०१/२०१० आयोगापुढे सादर केले आहे त्या पत्रात भरती प्रक्रियेबाबत गोपनियता राखण्यात यावी असे नमूद केले आहे. म्हणून अपीलकर्तास ही माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

८. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी महाराष्ट्र राज्य जिल्हा न्यायालय माहिती अधिकार अधिनियम २००९ चे नियम तयार केलेले आहे. त्या नियमातील नियम क्र. १३ (क) व (इ) नुसार लघुलेखक निम्नश्रेणी या पदाची भरती प्रक्रिया गोपनिय स्वरुपाची असल्यामुळे अपीलकर्तास मागितलेली माहिती उपलब्ध करुन देता येत नाही तसेच भरती प्रक्रियेच्या

यादीला मा. उच्च न्यायालयकडून मान्यता मिळाल्याशिवाय ती जाहिर करता येत नाही. व मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडून मंजूरी मिळाल्याशिवाय ते देता येणार नाही असे दिसून येते. तथापी लघुलेखक निम्नश्रेणी पदाची भरती प्रक्रिया सध्या कोणत्या स्तरावरती आहे याची माहिती अपीलकर्तास देणे संयुक्तिक होईल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकर्ता यांना लघुलेखक निम्नश्रेणी या पदाची भरती प्रक्रिया कोणत्या स्तरावर आहे यासंबंधीची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४६१/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रमण मोतीराम बन्सोड<br>C/o, जनसेवा जनलक्ष अन्याय भ्र. निराकरण समिती<br>केंद्रिय कार्यालय न्यू आशिर्वाद नगर, गीरोला (कारधा)<br>ता. जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक<br>ग्राम पंचायत कार्यालय चांदोरी (मालिपार)<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/१२/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ०१/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय चांदोरी (मालिपार) ता. जि. भंडारा यांचेकडे दि. २२/७/२०१० रोजी ग्राम पंचायती खर्चासंबंधातील एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी दि. ११/१०/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना ग्रामपंचायत खर्चाच्या निधीबाबत एकूण ७ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि. १३/०९/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी पंचायत समिती भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि. १२/१०/२०१० च्या पत्रान्वये दिला असून त्यात अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे नमूद करुन अपील निकाली काढले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सनावणीचेवेळी सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विहीत मुदतीत त्यांना मिळाली नाही तसेच मुद्या क्र. ६ ची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही व इतर मुद्यांची माहितीही त्यांना उशिरा मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतरही त्यांना समाधानकारक माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत चांदोरी जि. भंडारा यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि. २२/०७/२०१० चा अर्ज त्यांचेकडे दि. ३०/०७/२०१० रोजी प्राप्त झाला असून सदरचा अर्ज त्यांनी ग्रामपंचायतीच्या सभेत निर्णयासाठी ठेवला असता ग्रामपंचायतीने असा ठराव केला की, अर्जदाराने मागितलेली माहिती ही मोठ्या व व्यापक स्वरुपाची असल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष ग्राम पंचायतीमध्ये बोलावून त्यांनी मागितलेल्या माहितीचे निरिक्षण करावे व त्यानुसार त्यांना आवश्यक असेल तेवढी माहिती उपलब्ध करुन घ्यावी. कारण सदरच्या माहितीसाठी रु ५०००/- खर्च अपेक्षित असल्यामुळे ग्राम पंचायतीमध्ये निधी उपलब्ध नसल्यामुळे एवढा खर्च करणे अशक्य आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. १३/०८/२०१० ला पत्र पाठवून असे कळविले की, आपण प्रत्यक्ष ग्राम पंचायत कार्यालयात येवून रेकॉर्डची तपासणी करावी व आवश्यक असलेली माहिती घेवून जावी. परंतू अपीलकर्ता हे ग्राम पंचायत कार्यालयात रेकॉर्डची पाहणी करण्यासाठी गेले नाही त्यानंतर दि.२१/०८/२०१० च्या पत्रान्वये अर्जदाराने पून्हा सचिव ग्राम पंचायत कार्यालय चांदोरी यांचेकडे माहितीची मागणी केली. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दि. ११/१०/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली.

६. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, अपीलकर्ता यांना आवश्यक असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांच्या मार्फत उपलब्ध करुन दिलेली आहे.

७. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अपीलकर्ता यांना १ ते ७ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली असून संपूर्ण माहितीसाठी सुमारे ५०००/- रुपये इतका खर्च येण्याची शक्यता असल्यामुळे ग्राम पंचायत कार्यालयामध्ये रेकॉर्डची पाहणी करण्यासाठी अपीलकर्ता यांना बोलविले असता अपीलकर्ता हे गेले नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना ७ मुद्यांची माहिती पाठविण्यासाठी मुद्येनिहाय माहिती तयार करुन दि. ११/१०/२०१० ला पत्र निर्गमित केले. अपीलकर्त्याने माहिती उपलब्ध झाल्याचे सुनावणीत सांगितले परंतू मुद्या क्र. ६ मध्ये त्यांनी दारिद्रय रेषेखाली आणि अंतोदय कुटुंबाची यादी व त्या संबंधीत शासन निर्णय त्यांना मिळालेला नाही असे सांगितल्यावर जनमाहिती अधिकारी यांनी ग्राम पंचायत कार्यालयाकडे दारिद्रय रेषेखालील यादी व अंतोदय कुंटुंबाची यादी आणि त्यासंबंधातील शासन निर्णय इ. ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध नाही. तथापी सदरची माहिती ही तहसील कार्यालयात उपलब्ध होईल असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांना १ ते ७ मुद्यांची माहिती मिळालेली आहे व दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची यादी व अंतोदय योजनेच्या संदर्भातील यादीची शासन निर्णयाची प्रत अपीलकर्ता यांनी तहसिल कार्यालय यांचेकडून प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. ग्रामपंचायत चांदोरी येथील कार्यालयातील माहिती अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४६०/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री बाळकृष्ण रुपचंद खेडीकर<br>ग्रामसेवक कॉलोनी, संत कबीर वार्ड, भंडारा<br>ता. जि. भंडारा - ४४१ ९०४ | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नागपूर<br>प्रादेशिक कार्यालय गणेशपेठ- नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, भंडारा<br>विभागीय कार्यालय - भंडारा विभाग भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/१२/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १२/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ०१/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे सांख्यिकी अधिकारी श्री एस. बी. गणविर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०३/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे केळसर टोल नाक्यावर सवलतीच्या कुपन्सद्वारे टोल टॅक्स न भरल्यामुळे झालेल्या नुकसानी संबंधातील एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. माहितीचा कालावधी वर्ष २००१ ते २००४ असून माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३.	अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दि. २२/०३/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना ८ मुद्यांवर सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक यांचेकडे दि. २४/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. दि. २५/०९/२०१० रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली व १५/१०/२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय मुद्येसुद खुलाशाच्या स्वरुपात दिलेला आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४.	सुनावणीत अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांच्या दि. ०८/०३/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जाप्रमाणे एकूण १ ते ८ मुद्यांबाबत माहिती मागितली होती. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी दि. २२/०३/२०१० ला त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे सदरची माहिती अपूर्ण असून त्रोटक देखील आहे. त्यामुळे त्यांना पूर्ण माहिती मिळाली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अपूर्ण असल्यामुळे पुन्हा अपीलकर्तास काही प्रमाणात माहिती पुरविलेली आहे. परंतू ती माहिती देखील अपूर्ण आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे.

५.	जनमाहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, भंडारा यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दि. ०८/०३/२०१० च्या अर्जास अनुसरुन दि. २२/०३/२०१० च्या पत्रान्वये मुद्येसुद माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व उर्वरित काही माहिती देखील दि. २४/०६/२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांना पाठविलेली माहिती ही विभाग नियंत्रक यांच्या सहीने पाठविलेली आहे असे विभाग नियंत्रक यांनी सुनावणीत सांगितले अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाचा अर्ज प्रादेशिक व्यवस्थापक राज्य परिवहन महामंडळ नागपूर यांचेकडे पाठविलेला होता. तथापी प्रादेशिक कार्यालयाने प्रथम अपीलाचा अर्ज विभाग नियंत्रक भंडारा यांचेकडे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून कार्यवाहीसाठी पाठविला. अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाचा अर्ज २६/०८/२०१० रोजी प्राप्त झाला असून सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. २५/०९/२०१० रोजी घेवून प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना त्यांचेकडील दि. ०८/०३/२०१० च्या माहिती अर्जाच्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी दि. २२/०३/२०१० रोजी आणि दि. २४/०६/२०१० रोजी मुद्येनिहाय माहिती दिल्याचे दिसून येते. तथापी त्यांच्याकडे ज्या मुद्यांची माहिती जशा स्वरुपात आहे तशाच स्वरुपात त्यांनी ती माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांचे याबाबत असे म्हणणे आहे की, त्यांनी मागणी केलेल्या प्रत्येक मुद्यांची अपेक्षित कार्यवाही करुन त्यांना माहिती देणे आवश्यक आहे. तथापी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे कार्यालयात ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल त्याच स्वरुपात माहिती देणे अपेक्षित असते. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती आहे त्याच स्वरुपात दिल्याचे दिसून येते.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १३९१/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री जगदीश हरीचंद्र गेडाम<br>तिळक वार्ड, मंगळवारी, रामटेक<br>ता. रामटेक जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक<br>नागपूर जिल्हा (ग्रामिण) नागपूर<br>ता. जि.नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर जिल्हा (ग्रामिण) नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/१२/२०१०)**

**<u>निर्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०१/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. १६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०३/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर होते. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री वाय. टी. राठोड हे हजर होते. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर होते. अपीलकर्ता उशिरा हजर झाले. उत्तरवादी यांचे तर्फे पोलीस अधिक्षक (गृह) श्री डी. डी. तिडके माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत.

२.  अपीलकर्ता यांनी दि. २३/०४/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी, पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर (ग्रामिण) नागपूर यांचेकडे म. पो. शिपाई द्वारका धुर्वे नागपूर शहर नागपूर हिचे विरुध्द दि. ३०/०१/२०१० ला दिलेली लेखी तक्रार महाराष्ट्र पोलीस आयुक्त नागपूर शहर या कार्यालयाचे पत्र क्र. आ. ना/अर्ज/२४/२०१० दि. ३/२/२०१० अन्वये पोलीस आयुक्त अधिक्षक साहेब कार्यालय नागपूर ग्रामिण नागपूर यांना पाठविण्यात आले असून त्यावर केलेल्या कार्यवाही बाबत विलंबाचे कारणासह माहिती मिळावी अशी मागणी केलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

३.  जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर शहर यांनी दि. ०६/०३/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना आपला तक्रार अर्ज या कार्यालयाशी संबंधीत नसून पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामिण यांचेशी संबंधीत असल्याने मुळ प्रती चौकशीकामी पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामिण यांचेकडे अर्जशाखा यांचे पत्र दि. ०३/०२/२०१० अन्वये पाठविण्यात आलेला आहे. तरी आपण मागणी केलेल्या माहितीनुसार सदर अर्जावरी केलेल्या कार्यवाहीबाबत पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामिण यांचेशी संबंधीत माहिती अधिकारी यांचेकडे विहीत नमुन्यात अर्ज करुन माहिती अधिकारी यांचेकडून माहितीचे अधिकारात अर्ज करुन माहिती प्राप्त करावी असे नमूद केलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर ग्रामिण नागपूर यांचेकडे प्रथम अपील दि. ०८/०६/२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४.  अपीलकर्ता हे सुनावणीझाल्यानंतर उशिरा आल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. अपीलकर्ता यांनी दि. २३/०४/२०१० रोजी पोलीस आयुक्त नागपूर यांचेकडे महिला पोलीस शिपाई द्वारका धुर्वे हिच्या विरुध्द केलेल्या तक्रारीच्या संदर्भात त्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितल्याचे दिसून येते. तथापी अपीलकर्तास माहिती अधिकारी यांचेकडून विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झाला नाही म्हणून अपीलकर्ता यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा २३/०४/२०१० चा अर्ज त्यांचेकडे दि.२७/०४/२०१० रोजी प्राप्त झाला असून अपीलकर्ता यांनी केलेली तक्रार ही परस्पर त्यांनी पोलीस आयुक्त यांचेकडे सादर केली होती. सदरचा तक्रार अर्ज कार्यवाहीसाठी दि. ०३/०२/२०१० च्या पत्रान्वये पोलीस अधिक्षक ग्रामिण यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविला होता. अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्ताच्या दि. ३०/०१/२०१० च्या तक्रार अर्जाचा शोध घेतला असता सदरचा तक्रार अर्ज जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात आढळून आला नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील तक्रार रजिस्टर मधेही अर्जाची नोंद दिसून आली नाही. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि.०८/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२६/०६/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्तास स्पीड पोस्टद्वारे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित झालेले जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच त्यांनी सादर केलेला लेखी खुलासा याचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी त्यांच्याकडील दि.३०/०१/२०१० च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची त्यांनी मागितली होती तथापी अपीलकर्ता यांचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात शोध घेवूनही सापाडला नाही. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्तास दि. २६/०६/२०१० रोजी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती स्पीडपोस्टने अपीलकर्तास पाठविल्याचे दिसून येते. अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ताचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १४६७/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री निकेश मंगेश बन्सोड<br>प्लॉट नं. ५१०, न्यू नंदनवन ले आऊट ता. जि. नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/१२/२०१०)**

**निर्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ०१/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०३/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे नायब तहसिलदार श्री आशिष वानखेडे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचे तर्फे श्री धनगरे शिरस्तेदार उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १८/०६/२०१० रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय कामठी जि. नागपूर यांचेकडे भूगाव ता. कामठी येथील भूमापन क्र. ३२८, ३८१/अ यांच्या संदर्भात झालेल्या फेरफार नोंदी ज्या कागदपत्रांच्या आधारे झालेल्या आहेत त्या कागदपत्रांच्या प्रती मागितलेल्या दिसून येतात. सदर माहिती ४ मुद्यांवर मागितली असून माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी प. ह. क्र. २८ मौजा भुगाव यांना दिनांक २४/०६/२०१० ला माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता पत्र दिले व तसे अर्जदारास कळविले आहे. परंतू अपीलकर्ता यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दि. २९/०७/२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१२/०८/२०१० रोजी देण्यात आला असून त्यात अपीलार्थीने मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रती शोध घेऊन होईल तेवढ्या लवकर पुरवावे व शोध घेऊनही माहिती उपलब्ध झाली नाही तसेही अपीलार्थीस कळवावे असे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमूद केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. आजच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, भूगाव ता. कामठी येथील भूमापन क्र. ३२८, यामध्ये दि. २०/०९/२००० आणि भूमापन क्र. ३८१/अ मध्ये दि. २९/०६/२००४ रोजी ज्या कागदपत्रांच्या आधारे फेरफार झाले आहे त्या कागदपत्रांच्या प्रती म्हणजे बिनामोबदला हक्क सोडल्याचा दाखला तसेच मृत्यूपत्राची प्रत इ. कागदपत्रे त्यांनी मागितलेली आहेत. तथापी सदरची कागदपत्रे उपलब्ध नाहीत असे तलाठी यांनी अपीलकर्ता यांना कळविले आहे. त्यानंतर त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. १२/०८/२०१० रोजी घेण्यात येऊन माहिती उपलब्ध असल्यास लवकरात लवकर अपीलकर्ता यांना पुरवावी व नसल्यास तसे कळवावे असा निर्णय दिला. परंतू त्यानंतरही अपीलार्थीस अपेक्षित असलेली माहिती देण्यात आली नाही. तसेच सदर तहसिल

कार्यालय माहिती देण्यास नेहमीच टाळाटाळ करतात किंवा अपेक्षित माहिती देत नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे.

५. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार कामठी हे द्वितीय अपीलाच्या सुनावणीस हजर आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी भूमापन क्र. ३२८ आणि भूमापन क्र. ३८१ अ भूगाव ता. कामठी या गावातील या भूमापन क्रमांकावर अनुक्रमे भुमापन क्र. ३२८ चे दि. २०/०९/२००० व ३८१/अ चे दि. २९/०६/२००४ रोजी फेरफार घेण्यात आले आहे. सदर फेरफार पंजीची झेरॉक्स प्रत त्यांनी सुनावणीत दाखविली त्या फेरफार नोंदवहीमध्ये फेरफार ज्या कागदपत्रांच्या आधारे घेतले आहे ते म्हणजे गावनमुना ९ व १२ ची नोटीस, बिनामोबदला हक्क सोडल्याचा लेख इ. कागदपत्रांच्या आधारे फेरफार केल्याचे नमूद केले आहे. मात्र गाव नमुना ९ व १२ ची नोटीस आणि बिनामोबदला हक्क सोडल्याचा लेख ही कागदपत्रे प्रत्यक्षात फेरफार नोंदवही मध्ये किंवा कार्यालयात उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

वास्तविक पाहता ज्या कागदपत्रांच्या आधारे फेरफार केले जाते त्याची नोंद फेरफार नोंदवही मध्ये असणे जरुरीचे असते. मात्र सदरची कागदपत्रे आता उपलब्ध झालेली दिसत नाही म्हणून वरील दोन भूमापन क्रमांकावर (३२८ व ३८१/अ) ज्या कागदपत्रांच्या आधारे फेरफार झाले आहे त्या फेरफाराच्या संबंधीत कागदपत्रे उपलब्ध न होण्यास कोण जबाबदार आहे याची चौकशी उपविभागीय अधिकारी नागपूर यांनी करावी आणि त्या संबंधीतांविरुध्द योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक होईल.

६. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नागपूर यांचे वतीने शिरस्तेदार यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांच्याकडे दि. ३०/०७/२०१० रोजी दाखल झाले त्याची सुनावणी दि. १२/०८/२०१० ला घेण्यात आली व त्यावर निर्णय देऊन जनमाहिती अधिकारी यांना असे कळविले की, प्रस्तुत प्रकरणी पून्हा कागदपत्रांचा शोध घेऊन सदरची कागदपत्रे उपलब्ध झाल्यास अपीलकर्ता यांना पुरवावी व उपलब्ध झाली नसल्यास तसे अपीलकर्ता यांना कळवावे असे जनमाहिती अधिकारी यांना आदेशीत केले होते.

७. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखाली भूमापन क्र. ३२८ व ३८१/अ मध्ये वर नमूद केल्याप्रमाणे ज्या कागदपत्रांच्या आधारे फेरफार झाले आहे ती कागदपत्रे जनमाहिती अधिकारी यांचेकडे आता उपलब्ध नाहीत. तसे त्यांनी अपीलकर्ता यांना लेखी कळविले आहे असे आयोगापुढे सांगितले अपीलकर्ता यांच्या कागदपत्रांचा प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर पून्हा शोध घेण्यात आला परंतू त्यानंतरही ती कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत.मात्र पुन्हा एकदा अपीलकर्ता यांचे समक्ष संबंधीत तलाठी व मंडळ अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेले रेकॉर्डचे निरिक्षण करुन अपीलकर्ता यांना त्या निरिक्षणातून माहिती उपलब्ध झाल्यास कागदपत्रे देता येणे शक्य आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

तसेच प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, वरील दोन भूमापन क्रमांक ३२८ आणि ३८१/अ यावर ज्या कागदपत्रांच्या आधारे फेरफार झालेले आहे ती कागदपत्रे कार्यालयात आढळत नाही याची चौकशी उपविभागीय अधिकारी नागपूर यांनी करणे संयुक्तिक राहील म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी संबंधीत गावचे तलाठी, मंडळ निरिक्षक आणि अपीलकर्ता यांना तलाठी यांचे कार्यालयात रेकॉर्डच्या निरिक्षणासाठी कार्यालयीन कामकाजाचे दिवशी बोलवावे आणि निरिक्षणाअंती जी कागदपत्रे अपीलकर्तास पाहिजे आहेत ती कागदपत्रे जनमाहिती अधिकारी यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी .

२. वर नमूद केल्याप्रमाणे भूमापन क्र. ३२८ आणि ३८१/अ यामध्ये ज्या कागदपत्रांच्या आधारे फेरफार झाले आहे ती कागदपत्रे सद्यपरिस्थितीत का आढळून येत नाही याची चौकशी उपविभागीय अधिकारी नागपूर यांनी करुन संबंधीतांविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १४७२/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री निमाई अनिल दास<br>बिरसी कॅम्प, पोज परसवाडा (कामठा)<br>ता. जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय चामोर्शी<br>ता. चामोर्शी जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>तहसिल कार्यालय चामोर्शी<br>ता. चामोर्शी जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०७/१२/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ०९/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०७/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तहसिल कार्यालय चामोर्शी यांचेकडे दि. ०१/०७/२०१० रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये सुधान्य जतीन राय (जतीन राय) रा. रामकृष्णपुर पो. कोनसरी तालुका चामोर्शी यांना ५ एकर जमीन सरकार तर्फे देण्यात आली आहे त्या संबंधीत ७/१२ ची मागणी केलेली दिसून येते. तसेच २०१० मध्ये जी जनगणना झाली त्यात सुधान्य जतीन राय यांच्या परिवारात कोण-कोण आहेत, किती लोक

त्यांच्या कुटुंबात आहेत, त्यांचे वय इ. माहिती ज्या फॉर्म मध्ये दर्शविलेली आहे त्या फॉर्मची सत्यप्रत मागितलेली दिसून येते. सदर अर्जासोबत त्यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडले असून सदर माहिती टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दि. २८/०७/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असून त्यामध्ये मुद्या क्र. १ बाबत माहिती उपलब्ध असून यासोबत पाठविण्यात येत आहे व मुद्या क्र. २ मध्ये जनगणना-२०१० ची माहिती शासनाकडे सादर करण्यात आलेली असल्यामुळे या कार्यालयाकडे माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले आहे.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले की, त्यांना ५ एकर जमीन सरकार तर्फे देण्यात आली आहे त्या संबंधीत ७/१२ ची मागणी केली होती परंतू अद्यापपर्यंत त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तहसिल कार्यालय चामोर्शी तह. चामोर्शी जि. गडचिरोली यांचेकडे दि.१६/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांचे दि. ०१/०७/२०१० च्या माहिती अर्जातील माहिती ही तलाठी मौजा कोनसरी यांचेशी संबंधीत असल्यामुळे दि. ०७/०७/२०१० च्या पत्रान्वये अर्जातील माहिती तलाठयाकडून मागितली होती त्याला अनुसरुन तलाठी मौजा कोनसरी यांनी दि. १०/०७/२०१० रोजी ही माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे पाठविलेली आहे परंतू जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार चामोर्शी यांनी सदर माहिती अपीलकर्ता यांना पाठविण्यासाठी दि. २८/०७/२०१० रोजी पत्र तयार केले त्या पत्राबरोबर अपीलकर्तास ७/१२ चा उतारा, गाव नमुना ८-अ इ. कागदपत्रे संलग्न करुन त्यांचे कार्यालयातील संबंधीत लिपीक श्री अलोणे यांना पोस्टाने पाठविण्यासाठी दिली. तथापी श्री अलोणे कनिष्ठ लिपीक यांनी सदरची माहिती अपीलकर्तास जावक करुन पाठविलेली नाही. ही बाब अपीलकर्ताने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय

अपील दाखल केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांचे निदर्शनास आली. म्हणून त्यांनी सदर माहिती बाबत कनिष्ठ लिपीक श्री अलोणे यांना विचारणा केली असता त्यांनी ती माहिती अपीलकर्ता यांना पाठविलेली नसल्याचे कळविले. त्यामुळे माहिती का पाठविलेली नाही याबाबत त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी विचारणा केली असता कोणत्याही प्रकारचा त्यांनी खुलासा केला नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

तसेच आजच्या सुनावणीत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांचा प्रथम अपीलाचा अर्ज हा तहसिलदार चामोर्शी यांचेकडे प्राप्त झाला होता. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी हे उपविभागीय अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडे हा अर्ज पाठविणे आवश्यक होते मात्र कनिष्ठ लिपीक श्री अलोणे यांनी प्रथम अपीलाचा अर्ज देखील उपविभागीय अधिकारी गडचिरोली यांचेकडे पाठविलेला नाही. व अपीलकर्तास देखील त्याबाबत कळविले नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की, अपीलकर्तास पाहिजे असलेली माहिती त्यांचेजवळ आताही तयार आहे व अपीलकर्तास सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी त्यांनी दर्शविली म्हणून आयोगासमोर अपीलकर्तास पाहिजे असलेली माहिती देण्यात आली. व माहिती मिळाल्याची पोच घेण्यात आली. तथापी सदरची माहिती मिळण्यास अपीलकर्ता यांना विलंब झाल्यामुळे विलंबास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांवरती कार्यवाही करण्याची मागणी अपीलकर्त्याने केली.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्यास माहिती अधिकाराखाली पाहिजे असलेली माहिती ३० दिवसांचे मुदतीत देण्यात आलेली नाही. वास्तविक जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना पाठवावयाच्या माहितीच्या पत्रावर सही करुन ते अपीलकर्तास पाठविण्यासाठी कनिष्ठ लिपीक श्री अलोणे यांचेकडे दिले होते. सदरचे पत्र दि. २८/०७/२०१० ला सही करुन दिलेले होते मात्र श्री अलोणे यांनी सदर माहिती अपीलकर्ता यांना पाठविलेली नाही. सदरची माहिती पाठविण्यास सुमारे ४ महिन्याचा विलंब झाल्याचा दिसून येतो. व या विलंबास जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयातील कनिष्ठ लिपीक श्री अलोणे हे दोषी आढळून येतात. म्हणून श्री अलोणे यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ (५) नुसार माहिती अधिकारी समजण्यात येत असून त्यांचेविरुध्द माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) प्रमाणे शास्तीची कार्यवाही करणे न्यायोचित व संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्तास सुमारे ४ महिने उशिराने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे या विलंबास श्री अलोणे कनिष्ठ लिपीक हे दोषी आढळून येतात. म्हणून त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ (५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी समजण्यात येत असून त्यांना विलंबाबद्यल रु.५०००/- चा दंड अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये लावण्यात येत आहे.

२. सदरच्या दंडाची रक्कम श्री अलोणे यांचे दरमहाचे वेतनातून करण्यात येऊन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी. सदरची दंडाची (शास्तीची) वसूली कार्यवाही तहसिलदार चामोर्शी यांनी करावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४७१/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री निमाई अनिल दास<br>बिरसी कॅम्प, पो. परसवाडा (कामठा)<br>ता. जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी<br>पंचायत समिती चामोर्शी<br>ता. चामोर्शी जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>ग्राम पंचायत बाहादुरपुर पो. कोनसरी<br>ता. चामोर्शी जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०७/१२/२०१०)**

**<u>निर्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ०९/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०७/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०१/०७/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे श्री सुधान्य राय, रा. रामकृष्णपुर पो. कोनसरी तह. चामोर्शी यांच्या घरासंबंधीत मागिल वर्षाची २००९-१० ची घर टॅक्स पावती (सत्यापित झेरॉक्स) तथा त्यांच्या घरातील ४ खोल्या आहेत. ते घर कॉलमचे आहे की, विटांचे,

कवेलुंचे आहे याबाबत विस्तृत स्वरुपात लेखी प्रमाणपत्राची मागणी केलेली दिसून येते. सदर माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले असून दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसत नाही त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. १६/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती चामोर्शी यांनी दि. २७/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांच्या दि.१६/०८/२०१० च्या अर्जास अनुसरुन श्री आर. आर. उईके, सचिव ग्रामपंचायत, बहादुरपूर यांना त्यांच्या कार्यालयात अपीलकर्त्याने मागणी केलेल्या सर्व कागदपत्रांसहीत व दस्तऐवजासह उपस्थित राहण्याबाबत कळविलेले दिसून येते. परंतू जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत बहादुरपूर हे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले नाही त्यानंतर पून्हा दि. १८/११/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांना उपस्थित राहण्याकरिता संधी देण्यात आली अन्यथा माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दंडात्मक कार्यवाही करणे बाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलानंतरही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले की, त्यांनी सचिव ग्रामपंचायत बहादुरपूर ता. चामोर्शी यांचेकडे सुधान्य जतीन राय, रामकृष्णपूर चामोर्शी यांच्या घराबाबतची टॅक्स व घराचे विवरण याची माहिती मागितली होती परंतू आजपर्यंत जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत बहादुरपूर ता. चामोर्शी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे.

५. जनमाहिती अधिकारी हे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर असून त्यांनी सांगितले की, त्यांच्या कार्यालयात सुनावणीस उपस्थित राहणेबाबत जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत बहादुरपूर ता. चामोर्शी यांना दोनदा संधी देऊनही व वारंवार पत्र पाठवून सुध्दा ते कार्यालयात उपस्थित झाले नाही. व कोणतीही कागदपत्रे अथवा दस्तऐवज त्यांनी सादर केले

नाही तथापी प्रथम अपीलीय अधिकारी हे त्यांचे कार्यालयात अनुास्थित असतांना कोणीतरी त्यांचे टेबलावर अपीलकर्ता यांनी मागितलेल्या घराचे विवरण पत्र नमुना ८-अ ठेवले होते. मात्र सदरच्या घराचे २००९-१० चे टॅक्स भरला अगर कसे याची माहिती सचिवांकडून मिळालेली नाही. अपीलकर्ताने मागितलेल्या घराचे विवरण पत्र नमुना ८-अ प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आयोगासमोर उपलब्ध करुन दिले परंतू २००९-१० च्या टॅक्स बाबतची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध होवू शकली नाही.

६. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती नुसार त्यांना आयोगाच्या समोर घराचे विवरण पत्र नमुना ८-अ प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिले आणि ते अपीलकर्ता यांनी स्विकारले मात्र टॅक्स भरणे बाबतची माहिती अपीलकर्तास उपलब्ध झाली नाही. जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्राम पंचायत बहादुरपूर हे आयोगाकडील द्वितीय अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडील प्रथम अपीलाच्या सुनावणीस देखील हजर झाले नाहीत. तसेच अपीलकर्ता यांना ३० दिवसांच्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. यावरुन जनमाहिती अधिकारी तथा सचिव हे माहितीच्या अधिकाराखालील अर्जाकडे गांभिर्याने लक्ष देत नाही असे स्पष्ट होते तसेच अपीलकर्तास माहिती पुरविण्यास सुमारे ४ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागलेला आहे या विलंबासही जनमाहिती अधिकारी तथा सचिव हे जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना श्री सुधान्य जतीन राय यांच्या सन २००९-१० च्या घराची घरपट्टी भरल्याबाबतची माहिती अपीलकर्तास उपलब्ध करुन द्यावी.

२. जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत बहादुरपुर ता. चामोर्शी यांनी अपीलकर्तास ३० दिवसाच्या मुदतीत माहिती दिली नाही, तसेच सुमारे ४ महिन्यानंतर अपीलकर्तास फक्त घराचे विवरणपत्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिले. या विलंबास जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत बहादुरपूर ता. चामोर्शी हे सर्वस्वी जबाबदार दिसून येतात. त्यांनी विलंबाबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा आयोगाकडे सादर केला नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये त्यांच्याविरुध्द रु. ५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

३. सदरच्या शास्तीची वसूली ही जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत बहादुरपूर ता. चामोर्शी यांच्या दरमहाचे वेतनातून लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी. सदरची शास्तीच्या वसूलीची कार्यवाही खंडविकास अधिकारी चामोर्शी यांनी करावयाची आहे.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४७३/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री वामन उरकुडा सोनकुसरे<br>मु. पो. घोट<br>ता. चामोर्शी जि. गडचिरोली | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु द्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी<br>पंचायत समिती चामोर्शी<br>ता. चामोर्शी जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी<br>ग्राम पंचायत घोट<br>ता. चामोर्शी जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०७/१२/२०१०)**

**<u>निर्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १९/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ०९/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०७/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत घोट ता. चामोर्शी, जि. गडचिरोली यांचेकडे दि.१९/०६/२०१० रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये २ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहितीमध्ये अपीलकर्ता यांनी ग्राम पंचायतीने अतिक्रमण हटविले बाबत दि. ०९/०६/२०१० ला केलेल्या कार्यवाहीच्या ठरावाची प्रत आणि हॉटेलचे सामान उचलून नेले त्यासाठी सामान परत मिळण्यासाठी

पुरविलेल्या रकमेचा तपशिल इ. बाबत माहिती मागितलेली असून सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. ३१/०७/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती चामोर्शी, ता. चामोर्शी जि. गडचिरोली यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. आजच्या सुनावणीत अपीलकर्ता यांचे वतीने ॲड. कुंभारे यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, दि.१९/०६/२०१० ला जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अर्ज दाखल केला होता परंतू सदर अर्जावर जनमाहिती अधिकारी ग्रामपंचायत घोट यांनी कोणतीच कार्यवाही केली नाही. अपीलकर्ता यांचे अतिक्रमणातील हॉटेलचे सामान उचलून नेले त्याबाबतच्या ठरावाची प्रत आणि त्यासाठी रक्कम भरणा करणेबाबतची माहिती मागितली होती. मात्र त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही.

५. विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांनी सांगितले की, त्यांनी या ग्रामपंचायतीचा ग्रामविकास अधिकारी म्हणून अतिरिक्त पदभार दि. २७/०७/२०१० रोजी धारण केलेला आहे. त्यापूर्वी या ग्रामपंचायतीमधील तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री आर. जे. राठोड हे कार्यरत होते. ते निलंबीत झाल्यामुळे त्यांचा ज्यादा पदभार विद्यमान जनमाहिती अधिकारी यांना देण्यात आला. श्री राठोड हे निलंबीत झाल्यानंतर माहितीच्या अधिकाराखालील कोणतीही कागदपत्रे त्यांनी विद्यमान जनमाहिती अधिकारी यांना दिलेली नाहीत. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जानुसार माहिती देणेबाबत जनमाहिती अधिकारी यांना दि. ०९/०८/२०१० व दि. २७/०८/२०१० रोजी पत्र पाठवून ही बाब निदर्शनास आणून दिली. त्यानंतर विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तास ग्राम सभा ठरावाची सत्यप्रत दि.२५/११/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली. परंतू सदरची माहिती अपीलकर्ता यांनी घेण्यास नकार दिला म्हणून सदरचे पत्र

ग्रामपंचायतीकडे परत आले. तसेच हॉटेल मधील उचलून नेलेले सामान परत करण्यासाठी रु. १९०७/- च्या रकमेची भरपाई करण्याचे पत्र दि. २७/०७/२०१० रोजी पाठविले आहे. व त्याच्या पोचवर अपीलकर्ता यांनी सही सुध्दा केलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी रजिस्टर पोस्टाने पाठविलेली माहिती स्विकृत न करणे बाबत वकिलांनी असे सांगितले की, आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्यानंतर सदरचे रजिस्टर पत्र त्यांच्याकडे आले होते, परंतू सदर पत्र हे विलंबाने आल्यामुळे ते अपीलकर्ताने स्विकृत केले नाही.

६. अपीलकर्ता व विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या दि. १९/०६/२०१० च्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जाची कोणत्याही प्रकारची दखल तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांनी घेतली नाही. म्हणून अपीलकर्ता यांना विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचेकडून विलंबाने माहिती पुरविण्यात आल्याचे दिसून येते. तसेच सुनावणीचेवेळी आयोगासमोर ठरावाची प्रत देखील देण्यात आली. परंतू अपीलकर्तास ठरावाची प्रत व हॉटेलचे सामान परत घेवून जाणे बाबतची माहिती सुमारे ४ महिन्याच्या विलंबाने मिळालेली आहे म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांचेकडून सुमारे ४ महिन्याच्या विलंबाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी श्री आर. जे. राठोड हे दोषी आढळून येतात. तसेच आयोगाकडील सुनावणीस देखील ते अनुपस्थित होते. तसेच विलंबाबत त्यांनी समर्पक व स्पष्ट खुलासा देखील सादर केला नाही. त्यामुळे त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु ५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

२. सदरच्या शास्तीची वसूली ही संवर्ग विकास अधिकारी चामोर्शी ता. चामोर्शी जि. गडचिरोली यांनी करुन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १३४५/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री जनार्दन सोनाजी अहिरे<br>२२/१, प्रियदर्शनी कॉलोनी, आर. टि. ओ. जवळ,<br>सिव्हील लाईन्स नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय मोताळा<br>ता. मोताळा जि. बुलढाणा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>तहसिल कार्यालय मोताळा<br>ता. मोताळा जि. बुलढाणा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०७/१२/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २०/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २२/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर होते. जनमाहिती अधिकारी हजर होते. त्यांना सुनावणीची पुढील तारीख ०९/११/२०१० देण्यात आली. दि.०९/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचा फॅक्स संदेश उपलब्ध झाला असून जनमाहिती अधिकारी यांची प्रकृती ठिक नसल्यामुळे ते गैरहजर आहेत त्यांना सुनावणीची पुढील तारीख ०७/१२/२०१० देण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दि. १७/०६/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार मोताळा ता. मोताळा जि. बुलढाणा, यांचेकडे नकाशा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच सन १९७१-७२ मध्ये प्लॉट मिळालेला असून त्याच्यावर अतिक्रमण केले आहे त्यासंबंधी तहसिल कार्यालयात विनंती अर्ज केलेले आहेत त्यावर काय कारवाई केली. तसेच सांगळद गावचे पूनर्वसन झाल्या प्रकरणी त्याच्या नकाशाची प्रत व मालमत्ता पत्रक मिळणे बाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३.	सदर अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०७/०७/२००९ च्या पत्रान्वये सांगळद गावठाण मधील लेआऊटचा नकाशा उपलब्ध करुन देण्याबाबत कळविलेले दिसून येते. तसेच तलाठी यांना या कार्यालयाद्वारे पत्र देऊन चौकशी अहवाल मागविण्यात आला असून कार्यवाही करण्यात येत असल्याचे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. त्यानंतर दि. ०८/०७/२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहितीकरीता आवश्यक त्या फी चा भरणा करणेबाबत कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून प्रथम अपील दि. ३०/०८/२०१० रोजी तहसिल कार्यालय मोताळा जि. बुलढाणा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. २०/०९/२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले.

४.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, बुलढाणा जिल्हयात संगळद हे गाव बुडीत झाले म्हणून त्या गावाचे पुनवर्सन झाले आणि त्यापोटी मोताळा येथे त्यांना प्लॉट देण्यात आला. सदर प्लॉट हा त्यांना सन १९७१-७२ मध्ये मिळाला म्हणून सदरच्या प्लॉटचा नकाशा व मालमत्ता पत्रक त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे मागितलेले आहे. मात्र त्यांना त्याबाबतची माहिती अद्यापपर्यंत मिळालेली नाही असे सांगितले.

५.	जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी सुनावणीत सांगितले की, ते दि. ०१/११/२०१० रोजी नायब तहसिलदार या पदावर नुकतेच रुजु झाले आहेत. अपीलकर्ता यांच्या संबंधातील कागदपत्रांवरुन त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्ता यांना तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार

मोताळा यांनी त्यांच्याकडील दि. ०८/०७/२००९ च्या पत्रान्वये मौजे सांगळद येथील गावठाण मधील प्लॉटबाबतची माहिती मागण्यासाठी फी चा भरणा करण्याकरिता अपीलकर्ता यांना कळविले होते तसेच टपालाचा सुध्दा खर्च भरावा त्यानंतरच माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांमध्ये आढळून येते. परंतू अपीलकर्ता यांनी फी चा भरणा केला नाही व टपालखर्चाचा सुध्दा भरणा केलेला नाही. त्यामुळे त्यांना माहिती पुरविण्यात आलेली नाही असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

६. अपीलकर्ता व विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना फी भरणेबाबत दि. ०८/०७/२००९ रोजी पत्र पाठविलेले आहे त्याबाबतची पोच सुध्दा आढळून येते. मात्र अपीलकर्ता यांनी फी चा व टपाल खर्चाचा भरणा केलेला नाही. म्हणून अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांच्या संमतीने आयोगासमोर असे निश्चित करण्यात आले की, अपीलकर्ता यांनी नायब तहसिलदार यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी उपस्थित राहून माहितीसाठी आवश्यक त्या फी चा भरणा करावा व त्यानंतर अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री आकाश लिगाडे यांचेकडे तहसिल कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी उपस्थित राहून माहितीकरिता आवश्यक त्या फी चा भरणा करावा व जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने फी चा भरणा केल्यानंतर अपीलकर्त्यास माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

२.  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४८५/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री आनंद रामभाऊ चिमुरकर<br>भानापेठ वार्ड नं.२, पोलीस लाईन जवळ, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.विभाग)<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/१२/२०१०)**

**<u>निर्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २७/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ०९/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०९/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री अशोक वनकर हे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १३/०७/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय, जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. त्यामध्ये श्री मुधोळकर क.अ. आणि श्री गर्गेलवार अधिक्षक हे जि. प सामान्य प्रशासन

विभागामध्ये केव्हा पासून कार्यरत आहेत. तसेच त्यांची बदली इतरत्र झाली असल्यास त्यांना सा.प्र.वि. मध्ये प्रतिनियुक्तीकरिता देण्यात आलेल्या कालावधीची संपूर्ण माहिती. तसेच रोखपाल कक्षात बसत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती पदनामसह. अशाप्रकारची विविध कर्मचाऱ्यांबद्यल माहिती मागितलेली आहे.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सा.प्र.वि. जि. प. यांनी दि.२३/०७/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना कर्मचाऱ्यांविषयीची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून दि. २९/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०४/०९/२०१० रोजी देण्यात आलेला आहे. सदर निर्णयात त्यांनी असे नमूद केले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या मुद्या क्रमांक १ ते ५ ची माहिती प्रथम अर्ज दि.१३/०७/२०१० चे अनुषंगाने माहित संबंधितास अचुक देण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांनी अपील अर्ज दिनांक २७/०७/२०१० चे अपील अर्जान्वये वरील मुद्या क्रमांक १ बाबत अतिरिक्त शब्द प्रयोग करुन सुधारीत माहिती मागितलेली असल्याने अपीलकर्तास माहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे पून्हा माहिती मिळण्यासाठी विहीत नमुन्यात अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. अपीलकर्ता हे दिनांक ३०/०८/२०१० ला अपीलावर उपस्थित झाले व त्यांचे समक्ष सदर निर्णय देण्यात आला. असा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय जि. प. चंद्रपूर यांचेकडे श्री मुधोळकर व श्री गर्गेलवार या दोन अधिक्षकांची ५ मुद्यांवर माहिती मागितली होती मात्र त्यांना २ ते ५ मुद्यांबाबत माहिती प्राप्त झाली मुद्या क्र. १ बाबत सविस्तर माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या मुळ अर्जात मागितलेली माहिती त्यांना पुरविलेली आहे म्हणून अपील अर्ज फेटाळला आहे असे सुनावणीचेवेळी अपीलकर्ता यांनी सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनीधी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सुनावणीचेवेळी व्यक्तीशः हजर असून त्यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती त्यांना दि.२३/०७/२०१० च्या पत्रान्वये मुद्येनिहाय व सविस्तरपणे उपलब्ध करुन दिलेली आहे, व ते अपीलकर्त्याने मान्य केले आहे. तसेच अपीलकर्ता यांना मुद्या क्र. १ ची माहिती जी अपूर्ण असेल ती देण्यात येईल.

तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील फेटाळण्याचे कारण म्हणजे अपीलकर्ता यांच्या मूळ अर्जात त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. व मुद्या क्र. १ ची माहिती सुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे.

६. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना मुद्या क्र. १ ची श्री मुधोळकर व श्री गर्गेलवार या दोन कार्यालयीन अधिक्षकांची माहिती त्यांच्या नियुक्तीच्या सुरुवाती पासून कोण कोणत्या विभागात त्यांच्या नियुक्त्या झाल्या आहेत याचा तपशिल अपीलकर्ता यांना पाहिजे आहे. तसेच दोनही अधीक्षकांच्या नियुक्तीच्या सेवेपासून तर आजपर्यंत ते कोणत्या पदावर कार्यरत आहेत याचा सविस्तर तपशिल अपीलकर्तास उपलब्ध करुन देणे न्यायोचित व संयुक्तिक होईल. सदरचा तपशील उपलब्ध करुन देण्याची तयारी सुनावणीचेवेळी जनमाहिती अधिकारी यांनी दर्शविली म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना श्री मुधोळकर व श्री गर्गेलवार या दोन कार्यालयीन अधिक्षकांची प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून ते दि. १३/०७/२०१० पर्यंत झालेल्या नियुक्त्यांची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२.        अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १४८९/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री प्रमोद भिक्कुलाल गौडियाँ<br>भोईपुरा, नाथू न्याय मंदीर जवळ, दुर्गा पेंटरच्या घरी, नागपूर<br>ता. जि. नागपूर -४४० ०१८ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका<br>बाबानानक सिंधी हिंदी हायस्कूल<br>गरोबा मैदान नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १०/१२/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २७/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ०९/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे अधिक्षक श्रीमती पतंगे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २१/०७/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका बाबानानक सिंधी हिंदी हायस्कुल गरोबा मैदान नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखाली मिळालेल्या पगाराचे स्टेटमेंट मागितलेले दिसून येते. तथापी त्यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दि. २३/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका बाबानानक हायस्कुल गरोबा मैदान नागपूर यांनी अपीलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे दि.१०/०८/२०१० च्या पत्रान्वये कळविलेले दिसून येते.

४. आजच्या अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हे उपस्थित असून त्यांनी सुनाणीचेवेळी सांगितले की, ते बाबानानक सिंधी हायस्कुल गरोबा मैदान नागपूर येथे प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून कार्यरत होते. त्यांना १४/०२/२००५ पासून तर ३०/११/२००९ पर्यंतच्या पगार बिलाचे स्टेटमेंट पाहिजे होते. परंतू जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना पगार बिल स्टेटमेंट देण्यात आले नाही. म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय देण्यात आलेला नाही. मात्र दि.२२/०९/२०१० च्या पत्रान्वये मुख्याध्यापिका बाबानानक सिंधी हिंदी हायस्कुल गरोबा मैदान नागपूर यांना प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांनी माहिती उपलब्ध असल्यास संबंधिताला देण्यात यावी व तसे या कार्यालयास कळवावे असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांना माहिती देण्यात आली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दि. २१/०७/२०१० ला प्राप्त झाला आहे. त्या अर्जास अनुसरुन अपीलकर्ता यांना दि.१०/०८/२०१० च्या पत्रान्वये माहिती पाठविलेली आहे. अपीलकर्ता हे ठेकेदारी पध्दतीने ठेकेदारामार्फत केवळ एक महिना कामावर होते. आणि त्यांना ठेकेदारामार्फतच कामावर घेण्यात आले होते. म्हणून त्यांनी मागितलेल्या कालावधीचा पगार याची कोणतीही माहिती शाळेजवळ उपलब्ध नाही असे सांगितले. तसेच अपीलकर्ता हे त्यांच्या शाळेचे कोणतेही अधिकृत कर्मचारी नाही त्यामुळे त्यांना शाळेत प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून नेमणूकीचा

कोणताही आदेश नाही म्हणून त्यांना दि. १४/०२/२००५ ते ३०/११/२००९ पर्यंत कोणतेही पगार बिलाचे स्टेटमेंट देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असेही जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

६. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत त्यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील दि. २३/०८/२०१० रोजी दाखल झाले असून दि. १७/०९/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली त्यात अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध असल्यास संबंधीताला द्यावी असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना आदेशित केले.

७. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता हे बाबानानक सिंधीहिंदी हायस्कुल येथे प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर कार्यरत होते असे त्यांचे म्हणणे आहे. परंतू प्रयोग शाळा सहाय्यक म्हणून त्यांची नेमणूक झाल्याचा कोणताही पुरावा ते दाखवू शकले नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की, अपीलकर्ता यांनी केवळ ठेकेदारांमार्फत एक महिना काम केलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता हे शाळेचे अधिकृत कर्मचारी नाही म्हणून त्यांना दि.१४/०२/२००५ ते ३०/११/२००९ पर्यंतचा पगार देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे स्पष्टपणे अपीलकर्तास जनमाहिती अधिकारी यांनी कळविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना ते शाळेचे अधिकृत कर्मचारी नाही म्हणून त्यांना दि.१४/०२/२००५ ते दि.३०/११/२००९ पर्यंत पगार देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे स्पष्टपणे कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४८६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री कृष्णा रामकिशोर भांडारकर<br>मु. मुण्डीकोटा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु द्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>सुभाष विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय (कला) मुण्डीकोटा<br>पो. मुण्डीकोटा ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १०/१२/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ३०/०४/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ०९/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे उपशिक्षणाधिकारी श्री मुनघाटे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.३०/०४/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे विद्यालयात नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या नियुक्ती संबंधीचा तपशील मिळण्याबाबत एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली असून माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दि. १७/०५/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संस्थेच्या अधिकारातील असल्यामुळे संस्थेकडून माहिती प्राप्त झाल्यावर आपणास कळविण्यात येईल असे अपीलकर्त्यास कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.०१/०९/२०१० रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. त्यात अपीलकर्त्यास माहिती त्वरीत पुरवीण्याचे आदेश जनमाहिती अधिकारी यांना दिले. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही अपीलकर्ता यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे त्यांना जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडून कोणतीही माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. तसेच दि.१७/०५/२०१० च्या पत्रान्वये संस्थेकडे माहिती उपलब्ध होताच आपणास पुरविण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविले होते. मात्र अद्याप माहिती दिली नाही. अपीलकर्त्यास प्रामुख्याने सन २००४ पासून रोस्टर संबंधीतची माहिती प्राप्त झाली नाही आणि दि. ३०/८/२००५ रोजी दैनिक लोकमत वृत्तपत्रांमध्ये दिलेली जाहिरात आणि दि. ०४/०२/२००८ रोजी पुण्यानगरीमध्ये शिक्षक भरतीची दिलेल्या जाहिरातीची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही ती प्रत अपीलकर्ता यांना पाहिजे आहे. तसेच संस्थेने शिक्षक भरतीबाबतच्या ज्याकाही जाहिराती दिलेल्या आहेत त्यांच्याही प्रती अपीलकर्ता यांना आवश्यक आहेत असे त्यंनी सुनावणीत सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्याकडे अपीलकर्ता यांचा दि. ३०/०४/२०१० चा अर्ज हा हस्तदेय किंवा पोस्टाद्वारे सुध्दा प्राप्त झाला नाही. त्यावर अपीलकर्ता यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना अर्ज हा यूपीसीने पाठविला होता मात्र त्याचा कोणताही पुरावा अपीलकर्ता हे आयोगापुढे दाखवू शकले नाही. म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून अपीलकर्ता यांचा दि. ३०/०४/२०१० चा अर्ज प्राप्त झाला. त्याआधारे दि.२७/०९/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता यांनी कबूल केले.

६. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे हजर झालेले त्यांचे प्रतिनीधी यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांना अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत कळविलेले होते. तसेच प्रथम अपीलाची सुनावणी दि. ९/८/२०१०, दि.२३/८/२०१० व ३१/८/२०१० ला आयोजित करण्यात आली होती परंतू फक्त दि.२३/८/२०१० च्या सुनावणीसच जनमाहिती अधिकारी हे हजर होते. इतर सुनावणीस ते गैरहजर होते. त्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला व अपीलकर्त्यास माहिती पुरविण्याचे आदेश देण्यात आले.

७. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या दि.३०/०४/२०१० च्या अर्जाची प्रत जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेली नाही असे दिसून येते. परंतू सदर अर्ज प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या दस्तऐवजांमध्ये जोडलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संबंधीत अर्जानुसार अपीलकर्त्यास माहिती पुरविण्याचे आदेश जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना दिलेले आहेत. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दि. २७/०९/२०१० च्या पत्रान्वये १ ते ५ मुद्यांची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू सन २००४ पासून रोस्टर संबंधीतची माहिती आणि दि. ३०/८/२००५ चे दै.लोकमत पेपर व दि. ४/२/२००८ चे पुण्यानगरी या वृत्तपत्रांमध्ये शिक्षक भरती संबंधीत दिलेल्या जाहिराती आणि त्याशिवाय शिक्षक भरती बाबतच्या आणखी काही जाहिराती असल्यास अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना सन २००४ पासूनच्या रोस्टरची माहिती आणि शिक्षक भरतीसंबंधीत दिलेल्या दि.३०/८/२००५ चे दै. लोकमत पेपर व दि. ४/२/२००८ चे पुण्यानगरी या वृत्तपत्रांमध्ये दिलेल्या जाहिराती तसेच शिक्षक भरती संबंधीतील इतर जाहिराती अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्यात.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १४९८/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शालीक विठ्ठलराव कोरडे<br>के/ऑ. गुरुकृपा सर्व्हिसेस<br>तहसिल कार्यालय जवळ, नरखेड<br>ता. नरखेड जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी<br>पंचायत समिती नरखेड<br>ता. नरखेड जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक<br>पंचायत समिती नरखेड<br>ता. नरखेड जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/१२/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २७/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. १०/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ३१/०७/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती, नरखेड जि. नागपूर यांचेकडे कृषीविभाग अंतर्गत, महिला व बाल कल्याण विभागा अंतर्गत समाजकल्याण विभागाअंतर्गत, गटशिक्षण विभागाअंतर्गत, ओटीएसपी योजनेअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या

योजनेची तसेच लाभार्थ्यांची यादी. कर्मचारी ये - जा करतात की, मुख्यालयी कुठे राहतात त्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी १ एप्रिल १९९५ ते ३१ जुलै २०१० पर्यंतचा आहे. अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील आहेत याचा पुरावा सोबत जोडल्याचे नमूद केले आहे तसेच माहिती व्यक्तीशः घेणार असेही नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.२४/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना माहिती ही विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी लागेल, त्यास लागणारा शासकिय निधी मोठ्या प्रमाणात असून कार्यालयात तुर्तास निधी उपलब्ध नाही त्यासाठी उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्ता यांना कार्यालयात येवून निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. ०४/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१८/०९/२०१० रोजी देण्यात आला असून त्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ही १/४/१९९५ ते ३१/७/२०१० पर्यंतची असून १५ वर्षापूर्वीची असल्यामुळे एकूण ४५ मुद्यांची माहिती आहे सदर माहिती अंदाजे चार हजार पानापेक्षा जास्त परंतू कमी नाही एवढ्या विस्तारीत स्वरुपाची माहिती असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास लागणारा निधी व साधनसामुग्री बऱ्याच प्रमाणात वळवावी लागत असल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (९) अन्वये अर्जदाराला माहितीचे निरिक्षण करुन घेण्यासाठी दोनवेळा संधी देण्यात आली परंतू अपीलकर्ता यांनी माहितीचे निरिक्षण केले नाही. तसेच अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना सदर माहिती ही विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी लागेल त्यामुळे अपीलकर्ता यांना निरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीची प्रत काढण्याकरिता लागणारा निधी कार्यालयास मागणी करु व निधी उपलब्ध होताच माहितीच्या प्रती ताबडतोब उपलब्ध करुन देण्यात येतील अशी संधी देवूनही अपीलकर्त्याने ते मान्य केले नाही. म्हणून अपीलकर्त्याचे प्रथम अपील निकाली काढण्यात आले. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखाली जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि. ३१/०७/२०१० च्या अर्जान्वये कृषी विभाग, अनु. जाति उपयोजना OTSP, समाज कल्याण विभाग मार्फत मागासवर्गीयांसाठी देण्यात येणाऱ्या महिला बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, गट शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना इ. योजनांची व लाभार्थीची माहिती मागितली होती. मात्र त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि. २४/०८/२०१० ला पत्र पाठवून पाहिजे असलेली माहिती त्यांचे कार्यालयात येवून निरिक्षण करुन घ्यावी असे कळविले होते. परंतू निरिक्षण मागितले नव्हते तर प्रती पाहिजे होत्या असेही अपीलकर्ता यांनी सांगितले म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीला नंतरही अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती कार्यालयात येवून निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल असेच कळविण्यात आल्यामुळे अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही मोठ्या प्रमाणात व विस्तारीत स्वरुपात असल्यामुळे त्यांना निरिक्षणासाठी कार्यालयात बोलविण्यात आले तसेच ४०८ पानांची माहिती असल्यामुळे व त्यातून सर्व लाभार्थ्यांची यादी व सह्यांची माहिती काढावयाची झाल्यास संपूर्ण यंत्रणा या एकाच कामाकडे वळवावी लागेल व त्यासाठी लागणारा खर्च सुध्दा अवाक्याबाहेर आहे. तसेच पंचायत समितीद्वारे राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांची माहिती अपीलकर्ता यांना दाखविली व त्या माहितीच्या झेरॉक्स प्रतींचा येणारा खर्च ३ ते ४ लाख रुपये करावा लागेल कारण १५ वर्ष जुनी माहिती असल्यामुळे सर्व यंत्रणा या कामासाठी वळवावी लागेल त्यासाठी अपीलकर्त्याने आवश्यक असलेल्या रेकॉर्डचे कार्यालयात येवून निरिक्षण करणे योग्य होईल तसेच अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र हे स्वतःचे न जोडता वडीलांचे जोडलेले आहे व अपीलकर्ता यांच्या नावावरती जमिन आहे अगर कसे याची पडताळणी करण्यासाठी तहसिलदार नरखेड यांचेकडे दि. १८/०८/२०१० च्या पत्रान्वये माहिती मागितली असता नायब तहसिलदार नरखेड यांनी अपीलकर्ता यांचे नावे असलेला गाव सारडी प.ह.नं. ४ खाते क्र. १०८/२ च्या ७/१२ ची मुळ प्रत पाठविलेली आहे त्यावरुन अपीलकर्ता यांचे नावावर २.३८ हे.आर जमिन क्षेत्र असल्याचे नमूद आहे. त्यामुळे अपीलकर्ता हे BPL चा लाभ घेण्यास पात्र नाही असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. सदरच्या ७/१२ ची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविली.

६. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही विस्तारीत स्वरुपाची आहे व त्याच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन द्यावयाच्या झाल्यास त्यासाठी मोठा खर्च बसेल व सर्व शासकिय कामकाज बाजूला ठेवून सर्व यंत्रणा त्याकडे वळवावी लागेल व अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन द्यावी लागेल. त्यामुळे अधिनियमाचे कलम ७ (९) अन्वये अर्जदारास माहितीचे निरिक्षण करुन घेण्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी दोनवेळा संधी दिली परंतू त्यांनी ते मान्य केले नाही.

७. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतरद असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे जी माहिती मागितलेली आहे ती माहिती १५ वर्षे जुनी असून त्याचा शोध घेण्याकरिता शासकीय कामकाज बाजूला ठेवून सर्व शासकिय यंत्रणा या कामाकडे वळवावी लागेल. तसेच अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र त्यांनी स्वतःचे न जोडता त्यांच्या वडीलांचे जोडलेले आहे त्यामुळे अपीलकर्त्याने पंचायत समिती मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची लाभार्थ्यांची यादी व सह्यांची जी मागणी केलेली आहे ती मागणी विस्तारीत स्वरुपाची आहे व त्याच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन द्यावयाच्या झाल्यास ३ ते ४ लाख रुपये शासकीय निधी लागेल व तो निधी शासनाकडून उपलब्ध होईपर्यंत आणखी जास्त उशीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, पंचायत समिती नरखेड यांचे कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे निरिक्षण करुन घेणे व्यावहारिक दृष्ट्या योग्य राहील, त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तास कार्यालयीन कामकाजाचे दिवशीची तारीख वेळ कळवून त्यादिवशी बोलवावे व अपीलकर्ता उपस्थित झाल्यानंतर त्यांना आवश्यक ते दस्तऐवज निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावे.

२.	जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या पंचायत समितीच्या कार्यालयात सध्या जो काही निधी उपलब्ध असेल तेवढ्या निधीतून अपीलकर्ता यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या दस्तऐवजांच्या झेरॉक्स प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या. मात्र तत्पूर्वी अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असल्याचे खात्री करुन घेणे आवश्यक आहे.

३.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४९९/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री तिलोकचंद तेजराज जैन<br>गांधी चौक मु. पो. नरखेड<br>ता. नरखेड जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद नरखेड<br>ता. नरखेड जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ बांधकाम व पाणी पुरवठा पर्यवेक्षक<br>नगर परिषद नरखेड<br>ता. नरखेड जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/१२/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २७/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. १०/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १७/०८/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे नगर परिषद नरखेड यांचेकडील पत्र क्रमांक नपन/साबा/५६/२००८ दि. २५/२/२००८ च्या पत्रामध्ये येण्या जाण्याचा रस्ता असल्यामुळे मंजुरी देण्यात येत नाही असे कळविल्यामुळे त्या रस्त्याच्या जागेवर कोणाचा अधिकार आहे त्या लेखाची प्रत त्यांना द्यावी व दि. ०५/०३/२००८ ला वरील पत्राचे त्यांनी उत्तर दिले होते त्यावर काय कारवाई करण्यात आली

त्या माहितीची प्रत द्यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०३/०९/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती दिलेली दिसून येते. तथापी त्याबाबत अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि. १३/०९/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपील निकाली काढल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले की, त्यांच्या घराजवळून येण्याजाण्याचा रस्ता असून त्या जागेवर बांधकाम करण्याची मंजूरी त्यांनी नगर परिषदेकडे मागितली होती त्यावर नगरपरिषदेने बांधकामाच्या मंजूरीस नकार दिल्याने त्या जागेवर कोणाचा अधिकार आहे त्या लेखाची प्रत अपीलकर्ता यांनी मागितली होती तसेच दि.०५/०३/२००८ रोजी नगर परिषदेकडे याबाबत त्यांनी अर्ज दिला होता त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी ३/९/२०१० च्या पत्रान्वये जी माहिती दिली ती चुकीची दिलेली आहे म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतर सुध्दा त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी द्वितीय अपील दाखल केले.

५. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता बांधकाम विभाग नगर परिषद हे हजर असून त्यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज त्यांचेकडे दि. १८/०८/२०१० रोजी प्राप्त झाला त्या अर्जास अनुसरुन दि. ०३/०९/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली. तसेच दि.१३/१२/२०१० च्या पत्रान्वये सुध्दा माहिती कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. दि.३/९/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्तास असे कळविलेली दि. २१/०४/१९९८ चे विक्रीपत्रानुसार आपली मालकी हक्काची जागा ही प्रत्येकी ४७'x१०' व ४७'x१०' या प्रमाणे एकूण जागा उत्तर दक्षिण ४७ व पुर्व पश्चिम १०'+ १०'= २०' अशी नमूद आहे. या जागेशिवाय पश्चिमेकडील दक्षिणेकडील रस्ता हा आपले वापरासोबतच भाऊराव मल्लुजी कोरडे व इतर यांचे वापराचा असल्याबाबत संबंधिताचा तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. तसेच या कार्यालयास प्राप्त

झालेल्या त्यांचे मालकी हक्काबाबतचे दस्तऐवजानुसार सदरील रस्ता हा आपले घराचे बाजुने पूर्व - पश्चिम व पश्चिम बाजुने उत्तर दक्षिण असल्याचे नमूद आहे. तसेच अपीलकर्ता यांनी प्रसाधन गृहाचे बांधकामाची परवानगी ज्या जागेवर मागितलेली आहे ती जागा अपीलकर्ता यांच्या मालकीची असल्याबाबतचा पुरावा सादर करण्यास कळविण्यात आले होते. तसेच सुधारित नकाशा देखील सादर करण्याचे कळविण्यात आले होते मात्र अपीलकर्त्याने सुधारित नकाशाही दिलेला नाही व प्रसाधन गृह बांधकामाची जागा त्यांच्या मालकीची असल्याबाबतचा पुरावा सुध्दा दिलेला नाही असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.

६. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद नरखेड हे हजर आहेत त्यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांच्याकडे दि. १३/९/२०१० रोजी दाखल झाले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. २८/९/२०१० रोजी घेण्यात आली व निर्णय देण्यात आला. त्यामध्ये असे नमूद केले की, अपीलार्थी यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्र.१ नुसार जाण्या येण्याच्या रस्त्याबाबत रेकॉर्डमध्ये उपलब्ध असलेली श्री भाऊराव कोरडे यांच्या विक्री पत्राची झेरॉक्स प्रत अपीलार्थीस देण्यात यावी तसेच मुद्या क्र. २ मध्ये नमुद केल्यानुसार अपीलार्थी यांचे बांधकाम परवानगी मागणीचे अर्जानुसार नकाशाला ६० दिवसांचे आत परवानगी कां दिली नाही, यासंबंधीची स्वयंस्पष्ट व सविस्तर माहिती श्री तिलोकचंद तेजराज जैन, अपीलार्थी यांना यथाशिघ्र लेखी स्परुपात माहिती अधिकारी तथा कनिष्ठ बांधकाम व पाणी पुरवठा अधिकारी नगर परिषद नरखेड यांनी उपलब्ध करुन द्यावी व त्या माहितीची प्रत या कार्यालयास सादर करावी असे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढल्याचे सांगितले.

७. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जातील मुद्या क्र. १ नुसार जाण्यायेण्याच्या रस्त्याबाबत रेकॉर्डमधे उपलब्ध असलेली श्री भाऊराव कोरडे यांच्या विक्रीपत्राच्या झेरॉक्स प्रतीची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली आहे. तसेच अपीलार्थीस बांधकाम परवानगी नाकारण्यात आलेली आहे त्याबाबतचा सविस्तर खुलासा जनमाहिती अधिकारी यांनी दि. १३/१२/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्तास उपलब्ध करुन दिलेला दिसून येतो. तथापी अपीलकर्ता यांना प्रसाधनगृह ज्या ठिकाणी बांधावयाचे

आहे त्याबाबतच्या मालकी हक्काचा प्रश्न हा योग्य त्या प्राधिकरणाकडे जावून सोडविणे संयुक्तिक होईल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १५०९/नाग/२०१०</u>**

१. श्री बाबूराव भिकू मंदुरकर - **अपीलकर्ता**
अक्षय एक्सरे सोनोग्राफी क्लिनीक जवळ, महात्मा ज्योतिबा फुले वार्ड, भंडारा
ता. जि. भंडारा - ४४१ ९०४

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक - **उत्तरवादी**
जिल्हा भूमि अभिलेख कार्यालय भंडारा
ता. जि. भंडारा

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय भंडारा
ता. जि. भंडारा

**(आदेश पारित दिनांक २२/१२/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २६/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. १५/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने अधिक्षक जिल्हा भूमि अभिलेख भंडारा तर्फे श्री बेदरकर प्रमुख लिपीक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २८/०५/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांना सरकारी पट्टेदार अशी चुकीने नोंद झाल्याचे कळविले होते व ती झालेली नोंद कमी करण्याबाबत लेखी अर्ज दिला होता त्या अर्जाच्या अनुषंगाने चुकीने नोंद झाल्याचे पत्र व त्याची प्रत मिळावी अशी मागणी केलेली दिसून येते.

३.  अर्जाच्या अनुषंगाने अपीलार्थीला जनमाहिती अधिकारी यांनी दि. २९/५/२०१० च्या पत्रान्वये माहितीबाबत कळविलेले दिसून येते. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि. १४/६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १७/७/२०१० ला दिलेला असून त्यात अपीलकर्ता यांना सदरचे प्रकरणात नक्कलेच्या स्वरुपात माहिती प्राप्त करुन दिल्या जाते, प्रश्नाधीन स्वरुपात माहिती दिली जात नाही याबाबत माहिती समजावून दिली. तसेच अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये सादर केलेल्या अपील अर्जावर क्रमवारीनुसार नंबर आल्यानंतर आपले अर्जावर कार्यवाही करणेकरिता नोटीस पाठविण्यात येईल व त्यानंतर नियमानुसार सुनावणी घेवून अभिलेखाची खात्री करुन निर्णय पारित केल्या जाईल आणि तसे कळविण्यात येईल याबाबत अर्जदारास समजावून देण्यात आले. त्यानुसार त्यांचे समाधान झाले असून सदरचे अपील निकाली काढण्यास हरकत नसल्याचे त्यांनी कबुल केले असे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमूद केलेले आहे. मात्र अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.  अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांना सन १९५० पूर्वी शासकीय प्लॉट मिळालेला होता. त्या प्लॉटच्या प्रापर्टीकार्ड (आखिवपत्रिकेवर) आजही सरकारी पट्टेदार अशी नोंद झालेली आहे. सदरची नोंद चुकीने झालेली असल्यामुळे ती नोंद कमी करुन तसे प्रमाणपत्र त्यांना पाहिजे होते. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे दि. २९/५/२०१० च्या पत्रान्वये कळविले की, अपीलकर्ता यांचे या प्रकरणात अपील दाखल झाले असल्यामुळे त्या अपीलाचा निर्णय झाल्यानंतर त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल असे कळवून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज हा निकाली काढला. त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. १७/७/२०१० रोजी घेण्यात आली होती आणि प्रथम अपीलाचा निर्णय देखील दि. १७/७/१० रोजी देण्यात येऊन त्यांचे अपील फेटाळले आहे म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा दि.२८/५/२०१० चा अर्ज त्यांच्याकडे दि. २८/५/२०१० रोजी प्राप्त झाला असून अपीलकर्ता यांना दि. २९/५/२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले आहे. अपीलकर्ता यांनी प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये सरकारी पट्टेदार नोंद कमी करणे बाबत अधिक्षक भूमि अभिलेख भंडारा यांचेकडे अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नियमाप्रमाणे सुनावणी घेवून निर्णय झाल्यानंतर सरकारी पट्टयाची नोंद कमी करणेबाबत योग्य ती कार्यवाही नियमानुसार करण्यात येईल असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

६. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने प्रमुख लिपीक श्री बेदरकर हे हजर आहेत व त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील सुरवातीस उपसंचालक भूमि अभिलेख नागपूर यांचेकडे दि.१६/६/२०१० रोजी प्राप्त झाले होते मात्र प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी हे जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख भंडारा हे असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दि. २२/६/२०१० रोजी भंडारा कार्यालयाकडे पाठविले. सदर प्रथम अपीलास अनुसरुन प्रथम अपीलाची सुनावणी दि. १७/७/२०१० रोजी घेण्यात आली व त्याचदिवशी अपीलाचा निर्णय देण्यात आला. तसेच अपीलकर्ता यांनी भूमि अभिलेख भंडारा यांचेकडे त्यांचे प्लॉटवरील सरकारी पट्टयावरील सरकारी पट्टा नोंद कमी करण्यासाठी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील दाखल केले आहे ते अपील क्रमवारीनुसार निकाली काढण्यात येईल. याबाबत अपीलार्थीस तसे कळविण्यात येईल म्हणून प्रथम अपील निकाली काढण्यात आले.

७. अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी त्यांचे प्लॉटवरील सरकारी पट्टा कमी करण्यासाठी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख भंडारा यांचेकडे जे अपील दाखल केले आहे त्या अपीलाची सुनावणी क्रमावारीनुसार सुरु असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील त्या क्रमवारी नुसारच सुनावणी घेवून त्यावर कार्यवाही करण्यात येईल. आणि अपीलाच्या निर्णयानुसार अपीलकर्ता यांच्या

प्लॉटवरील सरकारी पट्टयाची नोंद कमी करण्याची योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कबूल केले. त्यामुळे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे संयुक्तिक दिसून येते. तथापी अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि. २९/५/२०१० च्या पत्रान्वये व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. १७/७/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास वस्तुस्थितीदर्शक माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १५१३/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री पुंजाराम धर्माजी वागदकर<br>मु. पो. सागरा<br>ता. भद्रावती जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद कार्यालय यवतमाळ<br>ता. जि. यवतमाळ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य<br>प्र. मा. रुईकर ट्रस्ट कनिष्ठ महाविद्यालय, नाझा<br>पो. नाझा ता. कळंब जि. यवतमाळ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २३/१२/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. १५/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री जयस्वाल हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ३१/५/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, प्र. मा. रुईकर ट्रस्ट कनिष्ठ महाविद्यालय, नाझा पो. नाझा ता. कळंब जि. यवतमाळ यांचेकडे श्री अशोक गंगारेड्डी दासरवार यांची सविस्तर प्रमाणित माहिती मिळण्याबाबत व सदर कर्मचाऱ्याच्या संस्थेत नेमणुकीसंबंधीची पात्रता कालावधी

इत्यादीची सन २०१० पर्यंतची अशी एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत डाकेने घेण्याचे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दि. १५/६/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहितीसाठी अतिरिक्त शुल्क रु.७२/- चा भरणा करण्याबाबत कळविलेले असून अपीलकर्त्याने शुल्क भरल्यानंतर दि.८/७/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. १६/८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी दि.८/०७/२०१० च्या पत्रान्वये त्यांना ५ मुद्यांपैकी ३ मुद्यांचीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यात मुद्या क्र. ३ नुसार जाहिरातीची प्रत त्यांना मिळाली नाही व मुद्या क्र.४ नुसार श्री दासरवार यांना शिक्षणाधिकारी (माध्यमिक) विभाग यवतमाळ यांनी दिलेल्या मान्यतेची प्रत मिळालेली नाही. म्हणजेच इतर दोन मुद्यांची माहिती अद्यापही त्यांना उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) विभाग जि. प. यवतमाळ यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीला नंतरही त्यांना कोणतीच माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.२५/१०/२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले.

५. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या माहिती अधिकाराखालील अर्जास अनुसरुन दि. ८/७/२०१० च्या पत्रान्वये एकूण १ ते ५ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू मुद्या क्र.३ च्या जाहिरातीची प्रत अपीलकर्तास पुरविली नाही त्याचे कारण म्हणजे श्री दासरवार यांच्या नेमणूकीची माहिती त्यांच्या पदाचे नावासंबंधीत माहिती मागितली होती त्यमुळे जाहिरातीची प्रत दिली नाही. तथापी त्यांचेजवळ जाहिरातीची प्रत आताही उपलब्ध आहे ती अपीलकर्तास उपलब्ध करुन देण्याचे

मान्य केले. व मुद्या क्र.५ बाबत संख्यात्मक स्वरुपात स्टॉफच्या मान्यतेची माहिती दिलेली आहे तथापी श्री दासरवार यांच्या वैयक्तिक मान्यतेची माहिती त्यांचेजवळ उपलब्ध असून ती अपीलकर्त्यास देण्याचे त्यांनी मान्य केले. म्हणून आयोगाच्या समोर जाहिरातीची प्रत व श्री दासरवार यांना दिलेल्या मान्यतेची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात आली. सदरच्या दोनही प्रत अपीलकर्ता यांनी स्विकारल्या त्या बाबतची पोच दिली.

६. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या वतीने कार्यालय अधिक्षक हे उपस्थित आहेत. त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी त्यांच्याकडे दि. १६/८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले होते त्या प्रथम अपीलाची नियमाप्रमाणे सुनावणी घेवून निर्णय देणे आवश्यक होते मात्र तशी कार्यवाही शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद यवतमाळ यांनी केलेली दिसून येत नाही. प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाल्यानंतर शाळेचे जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी शिक्षण विभाग (माध्य) जिल्हा परिषद यवतमाळ यांनी दि. २७/८/२०१० च्या पत्रान्वये केवळ माहिती पुरविण्याचे पत्र पाठविलेले दिसून येते म्हणून प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही तसेच त्य बाबतचा निर्णयही दिलेला नाही. म्हणून भविष्यात अशा प्रकारची पुर्नवृत्ती होणार नाही याची दक्षता शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद यवतमाळ यांनी घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

७. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना त्यांच्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये मागितलेली १ ते ५ मुद्यांची माहिती जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी दि. ८/७/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र त्यामध्ये जाहिरातीची प्रत आणि श्री दासरवार यांच्या पदाच्या नियुक्तीच्या मान्यतेची प्रत त्यांना उपलब्ध झाली नव्हती. सदरच्या माहितीच्या प्रती आयोगासमोर आज अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आल्या आणि अपीलकर्ता यांनी आयोगासमोर दोनही प्रती प्राप्त करुन स्वाक्षरी केली. अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १५०५/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री धनंजय मधुकर गद्रे<br>गद्रे वाडा, कोठी रोड, महाल, नागपूर<br>ता. जि. नागपूर -४४० ०३२ | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु द्ध** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त<br>गांधीबाग झोन क्र.६, महानगर पालिका, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता<br>गांधीबाग झोन क्र.६, महानगर पालिका, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २८/१२/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. १५/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर होते. सदर सुनावणीस संबंधीत जनमाहिती अधिकारी यांचे ऐवजी दुसरे उपअभियंता उपस्थित होते. त्यामुळे त्यांना प्रस्तुत प्रकरणाची कोणतीही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती म्हणून प्रस्तुत प्रकरणी संबंधीत जनमाहिती अधिकारी हे प्रवर्तन निरिक्षक मनपा नागपूर हे असल्यामुळे दि. २८/१२/२०१० रोजी सुनावणी ठेवावी आणि त्या सुनावणीस अपीलकर्ता व प्रवर्तन निरिक्षक मनपा यांना बोलवावे असा निर्णय झाला व त्या निर्णयास अनुसरुन नोटीस काढण्यात आले होते. दि. २८/१२/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ७/६/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी /वार्ड अधिकारी, गांधीबाग झोन म.न.पा. महाल नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखालील अर्जान्वये घर क्र. ४६१ अ कोठीरोड महाल येथील घरावर झालेल्या कारवाई संबंधी एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता गांधीबाग झोन क्र.६ महानगरपालिका नागपूर यांनी दि.२९/६/२०१० च्या पत्रान्वये तक्याच्या स्वरुपात माहिती दिलेली दिसून येते. त्यात मुद्या क्र. १, ३ व ४ च्या संदर्भात विचारलेली माहिती प्रश्नात्मक असल्यामुळे देणे आवश्यक नाही असे नमूद केलेले दिसून येते. मुद्या क्र.२ च्या बाबतीत नोंदवहीच्या झेरॉक्स प्रती संदर्भात कार्यालयीन नोंदवहीतील एकूण ११ प्रति असून २ रु. प्रती प्रमाणे २२ रु. केंद्रिय अभिलेख विभागाकडे भरल्यानंतर अपीलकर्त्यास देण्यात येईल असे नमूद केले आहे तर मुद्या क्र. ५ च्या संदर्भात कोणतेही सामान जप्त करण्यात आले नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविलेले दिसून येते.

४. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे हजर राहून असे सांगितले की, दि. ७/६/२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन जनमाहिती अधिकारी तथा प्रवर्तन निरिक्षक मनपा नागपूर यांचेकडे ज्या ५ मुद्यांवर माहिती मागितलेली होती, त्यामध्ये घर क्र. ४६१ अ कोठीरोड महाल बाबत झालेल्या कार्यवाही संबंधी त्यांना माहिती हवी होती त्या माहितीस अनुसरुन त्यांना मुद्या क्र. २ आणि ४ ची माहिती प्राप्त झाली. मात्र सदर माहितीतील १, ३, व ५ हे मुद्ये अतिक्रमण विभागाशी संबंधीत असल्यामुळे अतिक्रमण विभागाचे जनमाहिती अधिकारी यांनी दि.१६/९/२०१० च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती ही अयोग्य आहे म्हणून प्रथम अपील दाखल केले. तसेच अपीलकर्ता यांनी सुनावणीत पुढे असेही सांगितले की, त्यांच्या घराचे स्लॅब तोडण्यात आले होते मात्र जनमाहिती अधिकारी हे टिन काढण्यात आले असे नमूद करित आहेत, म्हणून सदरची माहिती ही चुकीची नमूद केलेली आहे. तसेच मुद्या क्र. २ च्या संदर्भात अतिक्रमण कार्यवाही काढण्याचे वेळी श्री महेश गद्रे हे उपस्थित नव्हते असेही जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. परंतू अतिक्रमण काढण्याचे वेळी श्री महेश गद्रे हे उपस्थित होते असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. मुद्या क्र. ५ च्या संदर्भात कोणतेही सामान जप्त केलेले नाही. आणि ते सामान

घरमालकास परत करण्यात आले आहेत असे जनमाहिती अधिकारी यांनी नमूद केले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि. १९/७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ४/८/२०१० रोजी देण्यात आलेला असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, गांधीबाग झोन क्र. ६, मनपा. नागपूर यांनी मुद्या क्र. १, ३ व ५ करिता माहिती अधिकारी प्रवर्तन अधिक्षक हे आहेत. सदर माहिती त्यांचे कडून देणे अपेक्षित आहे. मुद्या क्र. १, ३ व ५ करिता हा माहितीचा अर्ज प्रवर्तन अधिक्षक मनपा यांना उप विभागीय अभियंता, लोककर्म झोन क्र. ६ हे नस्तीसह पाठवतील व प्रर्वतन अधिक्षक यांनी उपरोक्त माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. मुद्दा क्र. २ ची माहिती देण्यात आलेल्या कागदपत्रांची नोटशीट क्र. N-१० वर उल्लेख आलेला असून ते स्वयंस्पष्ट आहे. अशा प्रकारे अपील निकाली काढण्यात येत असून प्रवर्तन अधिक्षक, मनपा यांनी १५ दिवसांचे आत माहिती अपीलार्थीस द्यावी असे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमूद केलेले आहे.

५. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा प्रवर्तन निरिक्षक मनपा नागपूर हे हजर आहेत. त्यांनी सांगितले की, अतिक्रमण तोडण्याची कार्यवाही करतांना कागदपत्रांवर ज्या नोंदी दिसून येतात त्या आधारे अपीलकर्त्यास उत्तर दिले आहे. आणि सदरची अतिक्रमण काढण्याची कार्यवाही हे संबंधीत उपअभियंता हे करित असतात. आणि उपअभियंता यांना दिलेल्या माहितीवरुन अतिक्रमाण काढण्याबाबतच्या अर्जास उत्तर दिले जाते.

६. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त मनपा हे हजर आहेत त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, अपीलकर्ता यांना त्यांचे विभागाशी संबंधीत असलेले मुद्या क्र. २ व ४ ची माहिती यापूर्वीच दिलेली आहे व मुद्या क्र. १, ३ व ५ बाबतची माहिती अतिक्रमण विभागाशी संबंधीत असल्यामुळे त्यांच्याकडून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्ता यांचे घर पाडतांना दि.२९/१२/२००७ रोजी घराचा स्लॅब पाडला किंवा घरावरील माळयावरचे टिन काढले याबाबत केलेल्या कार्यवाहीची खात्री रेकॉर्डवरुन पाहून करता येईल. कारण अतिक्रमण पाडतांना संबंधीत धारिकेवरती नोंदी केलेल्या असतात सदरच्या धारिकेतील अतिक्रमण पाडण्याबाबतची नोंदीची झेरॉक्स प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे शक्य आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

७. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्तास १ ते ५ मुद्यांची माहिती उपलब्ध झालेली आहे मात्र दि. २९/१२/२००७ रोजी अतिक्रमण पाडतांना निश्चित स्वरुपात कोणती कार्यवाही झाली आहे या संदर्भातील धारिकेमध्ये असलेल्या नोंदीच्या माहितीची झेरॉक्स प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य होईल. सदरच्या नोंदीची झेरॉक्स प्रत घेण्याची संमती अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे दिली म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना अतिक्रमण काढण्याच्या धारिकेतील संबंधीत नोंदीची झेरॉक्स प्रत विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १५२६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री डॉ. किसन हनुजी जांभुळकर (स्वातंत्र सेनानी)<br>माता टेकडी, इंदोरा, पो. बेझनबाग, नागपूर<br>ता.जि. नागपूर - ४ | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता (प्रशासन)<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.<br>प्रकाश भवन, लिंक रोड, सदर, नागपूर- ४४० ००१ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन)<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. शहर परिमंडळ,<br>प्रकाश भवन, लिंक रोड, सदर, नागपूर- ४४० ००१ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २९/१२/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांना प्राधिकृत केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी दि. ७/१/२००७ रोजी जनमाहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर शहर परिमंडळ, प्रकाश भवन लिंक रोड, सदर गड्डीगोदाम नागपूर यांचेकडे कोणत्या वर्षापासून महाराष्ट्र विद्युत मंडळ अस्तित्वात आले त्याची माहिती व कोणत्या वर्षापासून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

अस्तित्वात आली तेव्हापासून तर १/१/२००७ पर्यन्त अपीलकर्ता यांच्या घराचे इलेक्ट्रीक बिलाच्या झेरॉक्स प्रतीची माहिती मागितलेली असून सदर माहिती पोस्टाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दि. ९/१/२००७ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता सिव्हील लाईन्स विभाग म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित नागपूर यांना अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती आपल्या कार्यालयाशी संबंधीत आहे तेव्हा सदर माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते. तसेच कार्यकारी अभियंता (प्रशासन) नागपूर शहर परिमंडळ नागपूर यांनी अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती दि. १२/३/२००७ अन्वये जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात प्राप्त झाली असून सदर माहितीकरिता रु. २८/- चा भरणा करणेबाबत दि. १३/३/२००७ च्या पत्रान्वये कळविलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळ मर्या. नागपूर शहर परिमंडळ, प्रकाश भवन लिंक रोड, सदर गड्डीगोदाम नागपूर यांचेकडे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर शहर परिमंडळ, प्रकाश भवन लिंक रोड, सदर गड्डीगोदाम नागपूर यांचेकडे वारंवार गेलो असता माहिती देण्याचा कोणताच प्रतिसाद त्यांना मिळाला नाही तसेच त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती मुदतीत उपलब्ध झाली नाही. मात्र ३ वर्षानंतर त्यांना माहिती मिळाली म्हणून माहिती देण्यास मोठा विलंब झालेला असून सदर प्रकरणास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर /कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याची विनंती अपीलकर्ता यांनी आयोगापुढे केली. तसेच त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी द्वितीय अपील दाखल केल्याचे आयोगापुढे सांगितले.

५. आजच्या सुनावणीत जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारि अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर शहर परिमंडळ, हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे लेखी निवेदन सादर केले आहे. अपीलकर्ता यांचा दि. ८/१/२००७ चा अर्ज तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला होता त्या अर्जातील माहिती कार्यकारी अभियंता सिव्हील लाईन्स नागपूर यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांच्याकडे दि. ९/१/२००७ च्या पत्रान्वये

हस्तांतरित केला होता. त्यांनी माहिती तयार करुन अपीलकर्ता यांना दि. १३/३/२००७ च्या पत्रान्वये माहितीची फी भरण्यास कळविले होते. मात्र अपीलकर्ता यांनी माहितीची फी रु २८/- चा भरणा केला नाही म्हणून त्यांना मुदतीत माहिती देता आली नाही. परंतू अपीलकर्ता यांनी माहितीसाठी रु. २८/- चा भरणा दि.५/४/२०१० रोजी केल्यानंतर त्यांना दि. ५/४/२०१० रोजीच माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहिती फी रु.२८/- भरणेबाबत दि.१३/३/२००७ चे पत्र त्यांना दि. ५/४/२०१० रोजी मिळाले. मात्र विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, सदरचे पत्र अपीलकर्ता यांना पोस्टाने पाठविण्यात आले होते. मात्र दि.५/४/२०१० रोजी अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात उपस्थित झाले त्याचवेळेस माहितीची फी त्यांनी भरली व त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन सदरचे प्रथम अपील फेटाळले.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या दि. ८/१/२००७ च्या माहितीच्या अर्जानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.१३/३/२००७ च्या पत्रान्वये माहितीची फी रु. २८/- भरणेबाबत कळविले होते मात्र अपीलकर्ता यांनी फी चा भरणा केला नाही कारण त्यांना सदरचे पत्र हे दि. ५/४/२०१० रोजी मिळाले असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे मात्र जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असललेल्या कागदपत्रांवरुन सदर पत्र हे दि. १३/३/२००७ रोजी अपीलकर्तास पोस्टाने पाठविलेले दिसून येते. त्यामुळे सदरचे पत्र पोस्टाद्वारे विलंबाने प्राप्त झाल्याचे निष्पन्न होते.

सुनावणी दरम्यान अपीलकर्ता यांचे प्रामुख्याने असे म्हणणे आहे की, त्यांच्या घराच्या विजेची आकारणी ही कर्मशियल दराने करण्यात येत आहे. परंतू सदरचे घर हे फक्त रहिवासी म्हणून असल्यामुळे कर्मशिल दराने विजेची केलेली आकारणी ही चुकीची आहे म्हणून सदरच्या विजेची आकारणी ही घरगुती दराने करणे आवश्यक आहे त्यासाठी त्यांना सन १९७२ पासून त्यांचे घरावर आकारण्यात आलेल्या विजबिलांच्या झेरॉक्स प्रती हव्या आहेत जेणे करुन त्यांच्यावर झालेली ज्यादा विज बील आकारणी कमी करता येईल. मात्र या मुद्याबाबत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ हे १९७२ पासून अस्तित्वात होते त्यानंतर शासनाच्या निर्णयाप्रमाणे जून २००५ पासून मंडळाचे विभाजन होवून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी जून २००५ पासून अस्तित्वात आली. त्यावेळेचे विजबिलाचे रेकॉर्ड सी. पी. एल. च्या स्वरुपात हे सन स्टेंबर १९९७

पासून महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीकडे उपलब्ध आहे त्या पूर्वीचा कोणताही रेकॉर्ड विद्युत वितरण कंपनीकडे आज अस्तित्वात नाही म्हणून अपीलकर्तास १९७२ पासूनच्या विज बिलाचे झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन देणे शक्य नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे सी.पी. एल. च्या स्वरुपातील विजबिलाचे रेकॉर्ड सप्टेंबर १९९७ पासूनचे उपलब्ध आहेत. त्यापूर्वीचे कोणतेही रेकॉर्ड उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक व योग्य होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत त्यांच्या कार्यालयाकडे सी. पी. एल. च्या स्वरुपात सप्टेंबर १९९७ पासूनचीच माहिती उपलब्ध आहे त्यापूर्वीची विजबिलाची कोणतीही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलार्थीस विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १५३२/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर<br>ता.जि. चंद्रपूर -४४२ ४०२ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक (सं)<br>अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर<br>गिरीपेठ ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी<br>अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर<br>गिरीपेठ ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ३०/१२/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ३१/५/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनामाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर यांना श्री सुरेश दशरथ अत्रे, प्रधान मुख्य वनसंरक्षक, रामगिरी रोड, वनभवन सिव्हील लाईन्स नागपूर यांना दि. २८/९/१९९४ ला केस नं. DD/ TCSC/NGP/SDA/II-७१/१३ अन्वये वैधता प्रमाणपत्र क्र. २०२२२५००७६८१ ज्या कागदपत्रांच्या आधारे देण्यात आले त्या सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती (फार्म E व F सहित) मागितलेल्या दिसून येतात.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि.२६/७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्याचे सुनावणीत सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती अधिकाराखालील अर्ज त्यांच्याकडे दि. १५/६/२०१० रोजी प्राप्त झाला असून अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता अपीलकर्ता यांच्या अर्जातील माहितीप्रमाणे सदर माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ११ (१) अन्वये त्यांची संमती घेणे आवश्यक असते. त्यामुळे त्यांनी दि. २३/६/२०१० रोजी श्री सुरेश दशरथ अत्रे यांना त्यांच्या संमतीचे पत्र पाठविलेले आहे त्याची प्रत अपीलकर्ता यांना माहितीसाठी दिली. त्या अनुषंगाने श्री सुरेश अत्रे यांनी दि. ५/७/२०१० नुसार अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे त्यांना देण्यात येवू नये असे कळविले आहे. त्यामुळे त्रयस्थ व्यक्तीने त्यांच्याबाबतची माहिती देण्यास संमती दिलेली नसल्यामुळे अपीलार्थीस माहिती देता येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.१६/७/२०१० रोजी कळविलेली आहे.

५. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, श्री मनोहर धकाते हे शेकडो अर्जाच्या माध्यामातून जात प्रमाणपत्र पडताळणी समितीस माहिती मागत असतात. परंतू त्यात कोणतेही व्यापक जनहित नसल्यामुळे व वैयक्तिक हिताच्या दृष्टीने माहिती मागत असल्यामुळे त्यांचे यापूर्वीचे अपीलं राज्य माहिती आयुक्तांनी खारीज केले होते. तरीसुध्दा श्री मनोहर धकाते हे वारंवर कोणत्याही माहितीची मागणी करीत असतात. श्री मनोहर धकाते स्वत: व त्यांचा मुलगा प्रशांत मनोहर धकाते यांचे जात प्रमाणपत्र तपासणीचे प्रकरण जात पडताळणी समितीकडे ३ वर्षापासून प्रलंबित आहे त्यामुळे ते समितीवर दबावतंत्र आणण्याच्या दृष्टीने अर्जाच्या माध्यमातून समितीकडे माहिती मागत असतात. व याच कारणास्तव त्यांचे सर्व अपीले राज्य माहिती आयोगाने खारीज केलेले आहेत. आयोगाकडील अपील क्र. ९७५ ते ९७७/२०१० व अपील क्र. १०४६ ते १०४९/२०१० हे राज्य माहिती आयुक्तांनी खारीज करुन असे नमूद केले आहे की, "अशा परिस्थितीत

अपीलकर्ता यांना स्वत: माहितीची आवश्यकता नाही असे दिसून येत असून श्री धकाते यांची नैतिकता व विश्वासर्हता संशयास्पद दिसून येते" असे निरिक्षण आयोगाने नोंदविलेले आहे. असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

६. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक अनुसचित जमाति प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांच्याकडे दि. २६/७/२०१० रोजी दाखल झाले परंतू त्यांच्याकडे सध्या नागपूर आणि गडचिरोली जिल्हयाचे उपसंचालक पद तसेच दोनही जिल्ह्याचे आहरण व वितरण अधिकारी व त्याचप्रमाणे दोन्ही जिल्ह्याच्या जात प्रमाणपत्र समितीचे सदस्य सचिव पद तसेच दोन्ही जिल्हयाचे जिल्हा आदिवासी महिला सल्लागार समितीचे सदस्य सचिव पद त्याशिवाय मा. न्यायालयातील दोनही जिल्हयाच्या कोर्ट केसेसमधील प्रतिज्ञापत्र दाखल करावयाची कार्यवाही करावयाची असते. अशा व्यापक कार्यबाहुल्यामुळे त्यांना प्रथम अपील मुदतीत काढण्यास वेळ मिळाला नाही म्हणून अतिरिक्त पदांचा त्यांच्याकडून पदभार काढून घेणेबाबत त्यांनी शासनास पत्रव्यवहार केल्याचे सुनावणीत सांगितले. तथापी अशी वस्तूस्थिती जरी सांगितली तरी माहिती अधिकाराखालील तरतुदी लक्षात घेता प्रथम अपीलीय अधिकारी या नात्याने भविष्यात मुदतीत प्रथम अपीलाचा निर्णय यापूढे घेण्यात यावा अशी समज आयोगातर्फे प्रथम अपीलीय अधिकारी यांना देण्यात येत आहे.

७. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखाली मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्यामुळे आणि त्रयस्थपक्षाने सदरची माहिती अपीलार्थीस देण्याबाबत नकार दिल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दि. १६/७/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ११ (१) प्रमाणे माहिती देता येत नाही असे कळविलेले आहे ते योग्य दिसून येते कारण सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यामध्ये कोणतेही सार्वजनिक हित आहे असे दिसून येत नाही म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १५३०/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर<br>ता.जि. चंद्रपूर -४४२ ४०२ | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक (सं)<br>अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी<br>अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ३०/१२/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत परंतू त्यांनी सही केलेली नाही. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २६/७/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली यांना दोना मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. त्यात आदिवासी हलबा समाज समिती चंद्रपूर या नोंदणीकृत संस्थेने श्रीमती वृन्दा गणेश सयाम, हनुमान वार्ड धरमपुरी वडसा जि. गडचिरोली यांच्या जात वैधता प्रमाणपत्राबद्यल तसेच सत्यशोधक इंटेलेक्च्युअल

फ्रंट वर्धा यांनी श्री प्रमोद पांडुरंग येरणे, चंद्रपूर यांच्या विरुध्द जातीचे प्रमाणपत्राबाबत तक्रार दाखल केली होती त्या तक्रारीवर काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती अपीलकर्ता यांनी मागितलेली दिसून येते.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली यांनी अपीलकर्तास दि. १३/८/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही त्यामुळे पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांना आदिवासी हलबा समाज समिती चंद्रपूर या नोंदणीकृत संस्थेने श्रीमती वृंदा गणेश सयाम हिच्या बोगस प्रमाणपत्रांच्या जाती वैधता प्रमाणपत्राच्या आधारे जाती वैधता प्रमाणपत्र दिल्याबद्यल दि.१८/८/२००८ ला तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीची दखल घेऊन केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. तसेच सत्यशोधक इंटेलेक्च्युअल फ्रंट वर्धा यांनी श्री प्रमोद पांडुरंग येरणे, चंद्रपूर विरुध्द तक्रार क्र.१/२००९ दि. १६/२/२००९ ला दाखल केली होती (वडील, परधान, मुलगा गोंड, तसेच जातीचे प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केले नव्हते) या तक्रारीची आपल्या कार्यालयाने दखल घेऊन केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती मागितली होती. जनमाहिती अधिकारी यांनी दि.१३/८/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली मात्र त्यात तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. त्यामुळे अपीलकर्त्याने दि. ३०/८/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक (सं.) अनुसुचित जमाति प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे त्यांनी मागितलेल्या माहितीबद्यल कळविण्यात आले आहे. तसेच त्यांनी मागितलेल्या माहितीवर चौकशी सुरु आहे परंतू अद्याप चौकशी पूर्ण झालेली नाही. त्यामुळे चौकशी झाल्याशिवाय माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. व याबाबत दि. १३/८/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्तास सविस्तरपणे कळविलेले आहे.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या दोनही तक्रारींच्या माहितीबाबत दि. १३/८/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी उत्तर पाठविलेले आहे. तथापी सदरच्या दोनही तक्रारींची चौकशी सुरु असून चौकशी नंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविणे योग्य होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत त्यांच्या कार्यालयाकडून दि. १८/८/२००८ व दि.१६/२/२००९ या दोनही तक्रारींची चौकशी सुरु आहे म्हणून चौकशी पूर्ण झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १५२९/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड, चंद्रपूर<br>ता.जि. चंद्रपूर -४४२ ४०२ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक (सं)<br>अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी<br>अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ३०/१२/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत परंतू त्यांनी सही केलेली नाही. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.२६/७/२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली यांचेकडे श्रीमती वसूधा नाईक उपसंचालक (सं.) अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर/गडचिरोली यांचेबाबत एकूण २० मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती गडचिरोली यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही त्यामुळे सदर माहिती पुरविता येत नाही असे अपीलार्थीस कळविलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २६/७/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे श्रीमती वसूधा नाईक उपसंचालक अनुसुचित जमाति प्रमाणपत्र समिती गडचिरोली/नागपूर यांच्या शासकीय सेवाविषयक बाबींबाबत एकूण २० मुद्यांवर माहिती मागितली होती परंतू जनमाहिती अधिकारी यांनी सदरची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे कळविले. तथापी नागपूर कार्यालयाकडून त्यांना १०, ११, १२ व १३ मुद्यांबाबतची माहिती दि. २४/८/२०१० च्या पत्रान्वये प्राप्त झालेली आहे. मात्र इतर माहिती त्यांना प्राप्त झाली नाही. तसेच माहिती अधिकारी यांनी दि. १६/८/२०१० च्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध नाही म्हणून पुरविता येत नाही असे कळविलेले आहे. त्यामुळे अपीलार्थीस इतर मुद्यांची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि.३०/८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिला नाही. म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. २/११/२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केल्याचे आयोगापुढे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तथा अनुसूचित जमाति प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.२६/७/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दि. ३०/७/२०१० रोजी प्राप्त झाला तसेच सदर अर्ज अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी नागपूर यांचेकडे देखील पाठविला होता त्यानुसार नागपूर कार्यालयाने दि. २४/८/२०१० च्या पत्रान्वये त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस दिलेली आहे. मात्र गडचिरोली कार्यालयाच्या आधी नागपूर कार्यालय हे कार्यरत आहे मात्र गडचिरोली कार्यालय हे सन २००८ पासून नव्याने सुरु झाले आहे. त्यामुळे गडचिरोलीच्या या कार्यालयाकडे अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध नाही. म्हणून अपीलकर्त्यास दि. १६/८/२०१० च्या पत्राने कळविले आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, अपीलकर्ता श्री मनोहर धकाते यांनी श्रीमती वसूधा नाईक

उपसंचालक अनुसुचित जमाति प्रमाणपत्र समिती गडचिरोली यांच्या शासकिय सेवेची त्या रुजु झाल्यापासूनची १ ते २० मुद्यांची माहिती मागविलेली आहे. मात्र गडचिरोली हे कार्यालय नव्याने अस्तित्वात आल्यामुळे व श्रीमती वसूधा नाईक या नागपूर येथील उपसंचालक पदावर अनुसुचित जमाति जात प्रमाणपत्र समितीवर कार्यरत असल्यामुळे जनमाहिती अधिकारी नागपूर यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस दिलेली आहे असे जनमाहिती अधिकारी गडचिरोली यांनी सांगितले. तसेच त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की श्री मनोहर धकाते यांनी यापूर्वी माहिती अधिकारा अंतर्गत नागपूर व गडचिरोली समितीकडे अर्ज करुन त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली होती. म्हणून माहिती मागण्यामागे त्यांचा उद्येश व्यापक जनहित नसून समितीवर दबाव आणणे हा आहे कारण त्यांचे स्वतःचे व त्यांचे कुटुंबातील सदस्यांचे प्रकरण समितीकडे प्रलंबित आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

६. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक अनुसुचित जात प्रमाणपत्र तपासणी समिती ह्या उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांचे स्वतःशी संबंधीत आहे त्यामुळे त्यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही व निर्णयही दिलेला नाही. तसेच अपीलार्थीने मागितलेली माहिती ही प्रथम अपीलीय अधिकारी यांचेबाबतची असून ती वैयक्तिक स्वरुपाची आहे म्हणून त्रयस्थपक्षाची माहिती असल्याने अपीलकर्त्यास माहिती देण्यास त्यांचा विरोध आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे.

७. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी नागपूर यांचे कार्यालयाकडून मुद्या क्र. १०,११,१२ व १३ बाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू गडचिरोली पडताळणी समिती हे कार्यालय नव्याने स्थापन झाल्यामुळे या कार्यालयकडे श्रीमती वसुधा नाईक उपसंचालक यांची सर्व माहिती उपलब्ध नाही. तसेच सदरची माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्याने ती माहिती सोडून इतर माहिती अपीलार्थीस पुरविणे संयुक्तिक होईल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत श्रीमती वसुधा नाईक उपसंचालक अनुसुचित जमाति प्रमाणपत्र तपासणी समिती गडचिरोली यांची वैयक्तिक माहिती वगळून इतर माहिती गडचिरोली कार्यालय अस्तित्वात आल्यापासून विनामुल्य रजिस्टर पोस्टाने अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १४७७/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विलास भगवानजी तितरमारे<br>मु. बोथली पो. वेलतूर<br>ता. कुही जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागढ<br>ता. भामरागढ जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागढ<br>ता. भामरागढ जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ३१/१२/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०८/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर होते. व उत्तरवादी यांनी अधिवेशनामुळे पुढील तारीख मागितलेली आहे त्यामुळे सदर दिवशी सुनावणी होवू शकली नाही म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीची पुढील तारीख दि.३१/१२/२०१० देण्यात आली असून दि. ३१/१२/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांनाच प्राधिकृत केले आहे.

२.	अपीलकर्ता यांनी दि. १३/८/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे श्री आघाव रामप्रसाद देविदास राव यांचे संपूर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता त्यांचे प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्र तसेच लेखी व तोंडी गुण आणि गुणनिहाय यादी अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच न्यायालयिन कामाकरिता माहिती पाहिजे असल्याचे नमूद करुन माहिती मागितलेली आहे.

३.	अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांना विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती मागितलेली आहे त्या दोनही अर्जातील माहितीचा विषय एकच असून त्यांना केवळ श्री आघाव रामप्रसाद देवीदास राव यांच्या पत्रव्यवहाराच्या पत्त्याची माहिती उपलब्ध झालेली आहे परंतू त्यांचे मार्फत नौकर भरतीत व प्रतिक्षा यादीतील शैक्षणिक तसेच इतर कागदपत्रे उपलब्ध झालेली नाहीत. तसेच लेखी व तोंडी परिक्षेची गुणनिहाय यादी याची सुध्दा माहिती मिळालेली नाही, त्याचप्रमाणे लेखी परिक्षा उत्तिर्ण झालेल्या सर्व उमेदवारांची गुणनिहाय यादी तसेच श्री आघाव यांचे प्रकल्पग्रताचे प्रमाणपत्राची प्रत अद्यापपर्यंत उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्त्याने सांगितले.

४.	जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी सुनावणीचेळी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि. ०३/०२/२०१० व दि. १३/०८/२०१० च्या अर्जातील माहिती ही एकाच विषयावर आधारित असल्यामुळे अपीलकर्त्याला त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अवर सचिव आदिवासी विकास विभाग मंत्रालय विस्तार मुंबई यांच्या दि. २१/२/२००७ च्या पत्राचा संदर्भ देवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (आय) अंतर्गत सार्वजनिकाहिताचा कोणताही दृष्टकोन नसल्यामुळे ही माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळवून केंद्रीय माहिती आयुक्तांच्या दि. ०६/०२/२००६ च्या निर्णयाची प्रत देखील त्या सोबत त्यांनी जोडलेली आहे असे दि.२४/२/२०१० च्या पत्राने अपीलकर्तास कळविलेले असल्याचे पत्रामध्ये नमूद केले. त्यामुळे अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड जि. गडचिरोली यांचेकडे दि.६/१०/२०१० प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, अपीलकर्ता यांनी दि. १३/८/२०१० चा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दि. १५/८/२०१० रोजी प्राप्त झाला असून प्रथम अपीलावर रु. २०/- च्या स्टॅम्प ऐवजी फक्त रु. १०/- चा स्टॅम्प लावलेला होती त्यामुळे माहितीच्या पूर्ततेसाठी दि. ६/९/२०१० रोजी सदर अपील परत केले व त्यांनतर पन्हा दि. ६/१०/२०१० रोजी अपीलकर्त्याने रु. २०/- चा स्टॅम्प लावून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी श्री आढाव रामप्रसाद देवीदास राव यांचा पत्रव्यवहाराचा पत्ता दि.३/११/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिला. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय का दिला नाही याबाबतचा कोणताही खुलासा ते आयोगापुढे सादर करु शकले नाही. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी भविष्यात अशा प्रकारची पुर्नवृत्ती करु नये अशी सक्त ताकीद त्यांना आयोगाकडून देण्यात येत आहे.

६. अपीलकर्ता आणि जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी एकात्मिक आदिवासाी विकास प्रकल्प भामरागड गडचिरोली या कार्यालयामार्फत भरती करण्यात आलेल्या उमेदवरांची माहिती मागितली होती. सदर माहितीनुसार जनमाहिती अधिकारी यांनी दि. २४/२/२०१० च्या पत्राने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१) (आय) अंतर्गत सार्वजनिक हिताचा कोणताही दृष्टिकोन नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले आहे ते योग्य दिसून येत नाही. कारण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ अन्वये माहिती प्रकट करणेबाबत अपवाद दिला आहे. त्या अपवादामध्ये ज्या कर्मचाऱ्यांची निवड झालेली आहे. तसेच जे कर्मचारी प्रतिक्षा यादीत आहेत व अपीलकर्त्यने मागणी केलेल्या प्रकल्पग्रस्तांचया प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची प्रत इ. माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यास कोणतेही बंधन दिसून येत नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याला त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे व्यापक लोकहिताच्या दृष्टिने आणि पारदर्शकतेच्या दृष्टिने योग्य होईल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकर्ता यांना त्यांनी मागणी केलेल्या माहितीनुसार दि. ३/२/२०१० च्या माहिती अर्जाप्रमाणे माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १५३४/नाग/२०१०</u>**

१. श्री अमर ताराचंदजी तिरपुडे - **अपीलकर्ता**
C/o, जनसेवा जयलक्ष अन्याय भ्रष्टाचार निराकरण समिती महा.
केंद्रिय कार्यालय- न्यु आशिर्वाद नगर, गिरोला (कारधा) ता.जि. भंडारा

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
पंचायत समिती कार्यालय भंडारा
ता. जि. भंडारा

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
पंचायत समिती कार्यालय भंडारा
ता. जि. भंडारा

**(आदेश पारित दिनांक ३१/१२/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०९/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३१/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की, त्यांनी दि. १२/४/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय भंडारा यांचेकडे मौजा टेकेपार (माडगी) पो. गुंधारा जि. भंडारा येथे दलित वस्तीतील पाण्याच्या हातपंपाबद्यलची १ ते ५ मुद्यांची माहिती मागितली होती. सदर माहिती टपालाने घेणार असे नमूद केले होते.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दि. ७/५/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी सदर माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी, पंचायत समिती कार्यालय भंडारा यांचेकडे दि. १६/७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. २१/९/२०१० रोजी देण्यात आलेला आहे. सदरच्या प्रथम अपीलाने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी पंचायत समिती भंडारा तसेच ग्रामसेवक ग्रामपंचायत टेकेपार (माडगी) हे उपस्थित आहेत. त्यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि. १२/४/२०१० चा माहितीचा मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला असून सदर माहिती ही ग्राम पंचायत टेकेपार (माडगी) यांचेशी संबंधीत असल्यामुळे सदरचा अर्ज ग्रामसेवक, ग्राम पंचायत टेकेपार (माडगी) यांचेकडे दि. १३/४/२०१० रोजी हस्तांतरित केला. सदरचा अर्ज ग्रामसेवक टेकेपार (माडगी) यांना प्राप्त झाल्याचे ग्रामसेवकांनी सुनावणीत सांगितले. त्या अर्जास अनुसरुन ग्रामसेवक टेकेपार यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची मुद्येसूद माहिती तयार केली आणि सदर माहिती दि. ६/५/२०१० च्या पत्रान्वये ७/५/२०१० रोजी स्पीड पोस्टद्वारे अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. व त्याचा पुरावा ग्रामसेवक यांनी आयोगासमोर दाखवून त्याची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली.

५. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (आरोग्य) पंचायत समिती हे उपस्थित आहेत त्यांनी असे सांगितले की, दि. २१/८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल झाले त्यास अनुसरुन त्यांनी दि. २/९/२०१० रोजी प्रथम अपीलाची सुनावणी ठेवली. मात्र सदरच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर होते. म्हणून त्यांनी दि.२१/९/२०१० रोजी पुन्हा दुसरी सुनावणी लावली त्यावेळी अपीलकर्ता हजर होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांना ग्रामसेवकांच्या घरभाडे याची पावती व त्यांची पेमेंट स्लिप पाहिजे आहे त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास हवी असलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमूद केले. प्रथम अपीलाच्या निर्णयास अनुसरुन ग्रामसेवक यांनी पून्हा दि.२४/९/२०१० च्या

पत्रान्वये अपीलकर्तास घरभाडे पावतीची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

६. जनमाहिती अधिकारी तसेच ग्रामसेवक टेकेपार आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, ग्रामसेवक टेकेपार (माडगी) यांनी अपीलकर्तास त्यांनी केलेल्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये त्यांना दि. ७/५/२०१० व दि. २४/९/२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यांना पाहिजे असलेली पेमेंटची स्लीप आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र. १५३३/नाग/२०१०**

१. श्री बाळकृष्ण रुपचंद खेडीकर - **अपीलकर्ता**
ग्रामसेवक कॉलोनी, संतकबीर वार्ड, भंडारा
ता.जि. भंडारा ३ ४४१ ९०४

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (क व औस) - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
महाराष्ट्र वाहतुक भवन, डॉ. नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई-०८

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
महाराष्ट्र वाहतुक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई-०८

## (आदेश पारित दिनांक ३१/१२/२०१०)

## नि र्ण य

१. अपीलकर्ता यांनी दि. ०९/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/११/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३१/१२/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांचे तर्फे राज्य परिवहन मंडाळाचे नागपूर विभागाचे प्रमुख नियंत्रक श्री पी.एन. पाटील यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. ते उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २६/४/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या वैद्यकीय रजा संबंधातील माहिती मुद्दा क्र. अ ते फ अशा स्वरुपातएकूण ६ मुद्यांवर मागितलेली दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दि. १५/५/२०१० अन्वये अपीलकर्त्यास रु ३५/- च्या फी चा भरणा करणेबाबत कळविलेले दिसून येते. तसेच अपीलार्थीने मागितलेल्या मुद्या क्र. ब, क, ड, ई-१, २ व फ याबाबत उचित निर्णय सक्षम प्राधिकाऱ्यांनी घ्यावयाचा असतो असे कळविलेले आहे. या माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (क व औस) मध्यवर्ती कार्यालय म. रा. मार्ग परिवहन महामंडळ मुंबई यांचेकडे दि. २१/८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला असून दि. २१/१२/२०१० च्या पत्राने असे कळविले की, अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीतील माहिती तसेच अपील अर्जात नमूद केलेले मुद्दे सारखेच असून याबाबत माहिती अधिकारी यांनी कळविल्यानुसार प्रथम माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे नमूद करुन सदरचे प्रथम अपील नीकाली काढले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. आजच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांच्या दि. २६/४/२०१० च्या अर्जाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या वैद्यकीय रजा संबंधीतील माहिती त्यांना दि.१५/५/२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. मुंबई राज्य परिवहन कर्मचाऱ्यांच्या सेवेशी संबंधीत विनियम क्र. ९५ मध्ये वैद्यकीय रजे संबंधीचे नियम देण्यात आले आहेत. तसेच सदर सेवा विनिमयाची छायांकित प्रत व वैद्यकीय रजा मंजूर करण्याच्या अधिकाराबाबत परिशिष्ट 'प' या नियमांच्या एकूण ५ प्रती असून त्याचे शुल्क रु.१०/- व टपालखर्च रु.२५/- असे एकूण रु.३५/- चा भरणा करण्याबाबत माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे. मात्र सदरचे नियम अपीलकर्ता यांचे जवळ असल्यामुळे त्या प्रतीची त्यांना आवश्यकता नाही मात्र वैद्यकीय रजा मंजूरी संबंधीत त्यांना माहिती पाहिजे होती. तथापी ती माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही तसेच प्रथम अपील दाखल केल्यानंतरही अपेक्षित माहिती त्यांना मिळालेली नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

५. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई हे हजर आहेत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने सुध्दा त्यांनाच प्राधिकृत केले आहे. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि. २६/४/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे कुरिअर सेवेद्वारे दि. ३/५/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्ता यांच्या माहिती अर्जानुसार माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्ता यांना दि. १५/५/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. व त्यात

कर्मचाऱ्यांच्या सेवेसंबंधी विनियम क्र.९५ मध्ये वैद्यकीय रजे संबंधीचे नियम देण्यात आले आहे. तसेच वैद्यकीय रजा मंजूरी करणे बाबत परिशिष्ट 'प' विहीत केलेली आहे. त्यामध्ये माहितीकरिता रु ३५/- चा भरणा करणेबाबत कळविलेले असून मुद्या क्र. ब,क,ड, इ-१ या मुद्यांच्या बाबत वरील नियमांना अनुसरुन सक्षम प्राधिकारी हे निर्णय घेत असतात अशी माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच अपीलकर्ता यांनी माहितीची फी रु. ३५/- चा भरणा केलेला नाही म्हणून नियमाची प्रत त्यांना उपलब्ध करुन दिली नाही असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तसेच प्रथम अपीलास सुध्दा त्यांना बोलावू नये असे अपीलकर्त्याने कळविलेले आहे. उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे प्रथम अपीलाची सुनावणी न घेता निर्णय घेण्यात येवून प्रथम अपील फेटाळण्यात आले असेही जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीने राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या वैद्यकीय रजा मंजूरी संबंधीत माहिती मागितली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दि. १५/५/२०१० च्या पत्रान्वये अपीकर्त्यास संबंधीत माहिती उपलब्ध करुन दिली. तसेच परिशिष्ट प नुसार रजा मंजूर करण्याचे निर्णय सक्षम प्राधिकारी हे घेत असतात असे कळविले असून सदरच्या नियमांच्या प्रतीसाठी माहितीची फी रु३५/- भरण्याकरिता कळविले. परंतू अपीलार्थीने टपालखर्च व माहितीकरिता फी चा भरणा केला नाही. परंतू अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, वैद्यकीय रजेसंबंधीतच्या नियमांची प्रत त्यांच्याकडे आहे मात्र रजा मंजूर करतांना सरकारी कर्मचारी अधिकारी यांचा सल्ला घेण्यात येतो अगर कसे याबाबतची त्यांना माहिती पाहिजे होती या बाबत जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, रजा मंजूर करतांना सरकारी कर्मचारी अधिकारी यांचा सल्ला घेण्यात येत नाही. वैद्यकीय नियमानुसार रजा मंजूर करण्यात येते म्हणून अपीलकर्तास रजा मंजूर करतांना सरकारी कर्मचारी अधिकारी यांचा सल्ला घेण्यात येत नाही असे कळविणे संयुक्तिक होईल. तसेच वैद्यकीय रजा उशिरा मंजूर केल्यानंतर व्याज देण्याची तरतुद आहे अगर कसे याबाबची ही माहिती अपीलकर्तास पाहिजे होती त्या बाबत जनमाहिती अधिकारी यांनी वैद्यकीय रजा मंजूर झाल्यानंतर व्याज देण्याची तरतुद नियमात नाही हे देखील अपीलकर्तास कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी रजा मंजूर करतांना सरकारी कर्मचारी अधिकारी यांचा सल्ला घेण्यात येत नाही तसेच वैद्यकीय रजा उशिरा मंजूर केली असल्यास व्याज देण्याची नियमात तरतुद नाही असे स्पष्टपणे अपीलार्थीस विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**